# नीतिकथा

भाग – ३


सच्चरित्र घडविणाऱ्या गोष्टी
"भारत शिक्के", "राजाची कहाणी,"
इत्यादिंच्या लेखिका

एलसी ल्यूइस रॉसन
यांचे द्वारा संकलित



रजिस्टर्ड

सर्वाधिकार मुरक्षित



ओरिएंटल वॉचमन पब्लिशिंग हाऊस

सॅलिसबरी पार्क – पुणे १, भारत

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| मेंढपाळांस दर्शन | ... | ७ |
| आध्यात्मिक वाढ | ... | ९ |
| वाघ आणि बासरी | ... | ११ |
| पूर्वेकडला तारा | ... | १५ |
| तुटलेला पूल | ... | १७ |
| हवेवर विजय मिळविणारी मुलें | ... | २१ |
| यमदूत ? | ... | २५ |
| येई प्रकाशा | ... | २९ |
| मनीषा | ... | ३१ |
| मी वनवासी | ... | ३२ |
| माकडाची सुटका | ... | ३३ |
| आरोग्य संवर्धकांचे सम्मेलन | ... | ३९ |
| प्रभू येशूने धन्य ठरविलेले लोक | ... | ४३ |
| लहानगी कोंबडी | ... | ४५ |
| माझा देव आणि मी | ... | ४९ |
| आनंदाची विभागणी | ... | ५१ |
| लहान मूर्ति, थोर कीर्ति | ... | ५३ |
| मुंगी आणि नाकतोडा | ... | ५६ |
| देव तारी त्याला कोण मारी ? | ... | ५९ |
| सुरवंटाचे फुलपाखरुं | ... | ६५ |
| स्तुतिस निमंत्रण | . . | ६९ |
| शून्य संपावर जातो | ... | ७१ |

# प्रस्तावना

नीतिपूर्ण आणि व्यावहारिक जीवनाशीं सुसंबद्ध अशा गोष्टींची स्वस्त पुस्तकें छापण्यांत यावी असा आमच्या वाचकांचा आग्रह होता. त्यानुसार अशा पुस्तकांच्या मालेंतील पहिलें दोन भाग प्रकाशित करण्यांत आलें आहेत. आता याच मालेंतील तिसरा भाग आम्हीं वाचकांना सादर करीत आहोत.

या कथा "भारतीय शिक्के", "राजाची कहाणी", इत्यादि गोष्टींच्या लेखिका श्रीमती एलसी ल्यूइस रॉसन यांनी रचिल्या आहेत. हा तृतीय भाग या आशेने प्रकाशित करण्यांत येत आहे कीं दक्षिण आशियांतील वाचकांचीं असल्या प्रकारच्या वाङ्.मयाची गरज भरून काढण्यांत यावी.

प्रकाशक

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| मेंढपाळांस दर्शन | ... | ७ |
| आध्यात्मिक वाढ | ... | ९ |
| वाघ आणि बासरी | ... | ११ |
| पूर्वेकडला तारा | ... | १५ |
| तुटलेला पूल | ... | १७ |
| हवेवर विजय मिळविणारी मुलें | ... | २१ |
| यमदूत ? | ... | २५ |
| येई प्रकाशा | ... | २९ |
| मनीषा | ... | ३१ |
| मी वनवासी | ... | ३२ |
| माकडाची सुटका | ... | ३३ |
| आरोग्य संवर्धकांचे सम्मेलन | ... | ३९ |
| प्रभू येशूने धन्य ठरविलेले लोक | ... | ४३ |
| लहानगी कोंबडी | ... | ४५ |
| माझा देव आणि मी | ... | ४९ |
| आनंदाची विभागणी | ... | ५१ |
| लहान मूर्ति, थोर कीर्ति | ... | ५३ |
| मुंगी आणि नाकतोडा | ... | ५६ |
| देव तारी त्याला कोण मारी ? | ... | ५९ |
| सुरवंटाचे फुलपाखरुं | ... | ६५ |
| स्तुतिस निमंत्रण | ... | ६९ |
| शून्य संपावर जातो | ... | ७१ |




मेंढपाळांस दर्शन

# मेंढपाळांस दर्शन

रात्र हिवाळ्याची । थंडी कडाक्याची ।
झाली काळोखाची । सीमा तेव्हां ।।

परी मेंढपाळ । बसले जागत ।
कळप पहात । मेंढरांचे ।।

करूं लागले ते । गोष्टी मशिहाच्या ।
उत्कंठित त्याच्या । दिनासाठीं ।।

तोच एकाएकीं । प्रकाश आकाशीं ।
दिसला हो त्यासी । देवदूत ।।

म्हणे, "भिऊ नका । सांगतो सुवार्ता ।
ताराया जगता । आला प्रभू ।।

दाविद नगरीं । जन्मला बालक ।
तोच हो तारक । सकलांचा." ।।

तोच अगणित । नभीं देवदूत ।
जमले ते गात । दिव्य गान ।।

"गौरव ईश्वरा । जगांत हो शांति ।
मानवा वरती । कृपा त्याची." ।।

धन्य, धन्य, देवा, । धन्य तुझें ज्ञान ।
अखंड स्तवन । होवो तुझें ।।

स. आ. पाठक



बारा वर्षांचा येशू त्याच्या ज्ञानानें विद्वानांस चकित करतो.

# आध्यात्मिक वाढ

वृद्धीचा नियम । देवा, त्वां लाविला ।
परी न पाळीला । आम्हीं, बापा ।।

वाढतो शरीरें । मनें परी पोरें ।
ऐसे आम्हीं सारे । अज्ञ जन ।।

परी प्रभू येशू । सर्वांगी वाढला ।
मानव जाहला । पूर्ण खरा ।।

पूर्ण त्याचे ज्ञान । पूर्ण त्याचे प्रेम ।
पूर्ण त्याचे धर्म –पालन हो ।।

पूर्ण त्याचे ठायीं । आत्मिक सामर्थ्य ।
औदार्य, पावित्र्य । पूर्ण त्याचे ।।

तयासम, देवा, । पवित्र प्रेमळ –
व्हाया, बुद्धि बळ । देई आम्हां ।।

तुझिया ज्ञानांत । प्रीतित, भक्तींत ।
त्यागांत, सेवेंत । वाढ व्हावी ।।

देई ऐसे दान । करी येशूसम
गाऊं तुझे नाम । आमरण ।।

स. आ. पाठक



खेड्यातील लोकांना वाघाचा सतत उपद्रव होत होता.

# वाघ आणि बासरी

गंगाराम बागेंतील एका दगडावर बसून डवक्याभोंवतीं बांध घालीत होता. ते करीत असता तो त्यांतील कमळांच्या जाळीतून इकडून तिकडे झरझर फिरणाऱ्या निळया सोनेरी माशांकडे पाहात होता. ती जागा फारच सुंदर होती. बागेत उंच डौलदार झाडें होती. त्यांची पानें हलत होती. विविध रंगांची फुलें झुलत होती. तरी गंगाराम उदास होता. आपण केव्हां मोठे होऊ व नांव कमवूं याचा त्याला गहन प्रश्न पडला होता!

गंगाराम दिवसभर उदास होता. सकाळीं अगदीं उजाडण्यापूर्वीच सगळे लोक वाघाच्या शिकारीला निघून गेले होते. आसपासच्या खेडयांतील लोकांना एका भयंकर वाघाचा सतत उपद्रव होत होता. लोकांत घबराट निर्माण झाली होती. म्हणून गंगारामचे मालक, मि. स्मिथ, हे वाघाला ठार मारण्यासाठीं आले होते. आज सगळे वाघाच्या शिकारीला निघून गेले आणि गंगाराम घरीं वायकांच्या बरोबर एकटाच राहिला. वाघाच्या शिकारीला जायच्या वयाचा तो नव्हता.

साहजिकच गंगारामला तो दिवस सुना वाटत होता. त्याला मालकाच्या मुलाशीं, आर्थरशीं, खेळायचे होते. परंतु आर्थरच्या आयाला ते पसंत नव्हतें. मिसेस स्मिथबद्दल त्याला खूप आदर होता. परंतु उष्णतेमुळें त्यांचे डोकें दुखत होते. त्यांना त्रास होऊ नये म्हणून शांतता राखणें आवश्यक होते. त्यांनी गंगारामला दिलेली बासरीसुद्धां त्याच्या मनाला रिझवूं शकत नव्हती.

ही बासरी म्हणजे गंगारामचा मोठा ठेवा होता. ती त्याला फार आवडे. मिसेस स्मिथने ती कशी वाजवायची हें त्याला थोडेफार शिकविले होते. केव्हां केव्हां त्या पियानोवर त्याच्या बासरीची साथ करीत.

एकदां तो आणि मिसेस स्मिथ आपआपली वाद्यें वाजवीत असतां उघडया खिडकींतून एक साप आंत आला. खोलीच्या मध्यावर येऊन तो थांबला. डोके उंचावून संगीताच्या सुराबरोबर आपला फणा पुढें मागें डोलवूं लागला. गंगारामने त्याला प्रथम पाहिलें.

" साप, बाईसाहेब, साप! " घाबरल्यामुळें कसेंबसें त्याच्या तोंडातून शब्द बाहेर पडले.

मिसेस स्मिथने मान वर करून पाहिलें. तो एक नाग होता. तरी त्या वाजवीतच राहिल्या. त्यांचा चेहरा पांढरा पडला. परंतु त्या थांबल्या नाहीं. "त्याला संगीत आवडते, गंगाराम! तो आपल्याला इजा करणार नाहीं," त्या म्हणाल्या.

आता काय करावें हा विचार गंगारामच्या मनांत आला नाहीं तोंच त्यांचे पाळलेले मुंगूस तिथें आले आणि त्याने त्या सापाची मानच पकडली. साप तडफडत मेला.

गंगारामला साप आणि संगीत या गोष्टींचे आश्चर्य वाटले. त्याने त्यावद्दल मिसेस स्मिथला विचारलें. त्यांनी त्याला निरनिराळे प्राणी संगीताने कसे मोहित होतात याच्या विलक्षण कथा सांगितल्या. त्या असेंही म्हणाल्या कीं, "कांहीं प्राण्यांना संगीत आवडते आणि कांहींना तें आवडत नाहीं. कांहीं प्राणी उलट संगीताला खूप घावरतात. हिंस्र वंगाली वाघ हा बासरीच्या उंच स्वराने अगदीं भयभीत होतो."

"एवढा मोठा वाघ नि भितो!" गंगारामने आश्चर्योद्गार काढला.

त्यावर मिसेस स्मिथ त्याला म्हणाल्या, "वाघाच्या कानाचे पडदे नाजूक असतात. वासरीच्या उंच तीव्र स्वराने ते दुखूं लागतात. म्हणून तो त्यापासून दूर पळतो."

यावर त्याचा विश्वास बसत नव्हता तरी तो शांतपणे ऐकत होता.

आता या गोष्टी गंगाराम आठवीत होता नि आपले पाय कमळांच्या डवक्यांतील पाण्यांत हलवीत होता. सूर्य पश्चिमेकडील घनदाट जंगलांच्या टेकडीखाली उतरला होता. बागेंत अंधार पडू लागला होता.

गंगारामच्या मनांत वासरीचा विचार आला. "आता सर्व वातावरण शांत व शीतल आहे. बाईसाहेबांचे डोकें दुखायचेही थांबले असेल. तेव्हां त्या आपल्या वासरीची पियानोवर साथ करतील," तो स्वत:शीं पुटपुटला. त्याने आपले पाय पाण्यांतून वाहेर काढलें आणि नोकरवर्गासाठी वांधलेल्या खोल्यांच्या दिशेने तो धावत गेला. तिथें एका लहानशा खोलींत शिरला. लहान मुलांच्या चित्रविचित्र वस्तूंनी ती खोली भरली होती. कोपऱ्यांत एक चंदनी लाकडाची पेटी होती. गंगारामने ती उघडली व त्यांतून वारीक काळी बासरी वाहेर काढली. क्षणभर ती त्याने प्रेमाने कुरवाळली.

आतां काळोख पडूं लागला होता. अंधूक प्रकाशांत बाग फार सुंदर दिसत होती. हवेत फुलांचा सुगंध दरवळला होता. आणि रातकिड्यांचा आवाज ऐकूं येत होता. गंगाराम ओसरीवर आला. चोरपावलांनी मधल्या दिवाणखान्यांत गेला. परंतु मिसेस स्मिथ तिथें नव्हत्या. त्यांना शोधत तो निघाला. घरांत कमालीची शांतता पसरली होती. लहानग्या आर्थरच्या खोलीत त्या असतील असे त्याला वाटलें. त्याला आर्थर बाळालाही पाहायचे होते. हळूच तो त्या खोलींत शिरला.

पण उंबरठ्यावर तो एकदम थांबला. त्याने जें पाहिलें त्याच्या भीतीने तो पार गारठला.

बडासमोर एक भला मोठा वाघ होता. तो नरभक्षकच असणार. माणसांच्या वस्तींत दुसऱ्या कुणा वाघाने यायचे धाडस केले नसते. त्याची शेपटी वर-खाली होत होती. त्याचे भयंकर निळे डोळे आर्थरवर केंद्रित झाले होते. आर्थर वाघाकडे बघून हात हलवीत 'कुत्तू, कुत्तू' अशा हांका मारीत असल्याचे गंगारामला दिसलें.

आर्थरला मिसेस स्मिथनी कुशींत धरले होते. त्यांचा चेहरा भयभीत झालेला होता. त्यांचे डोळे वाघावर खिळले होते.

गंगारामने आपल्या अंगात असेल नसेल तें सर्व धाडस एकवटलें. त्याला आपल्या आवडत्या मालकिणीचा व लहानग्या आर्थरचा जीव वाचवायचा होता. त्याकरता आपला जीवही खर्ची घालायला तो तयार होता. धाडसी गंगाराम बासरी उगारून चटकन् वाघाच्या व त्यांच्यामध्यें जाऊन उभा राहिला. वाघाने लगेच संतापून आर्थरवरचे आपले डोळे गंगारामवर रोखलें.

"गंगाराम, तुझी बासरी, तुझी बासरी," मालकिणीचे हळूवार शब्द गंगारामच्या कानावर पडले. त्या म्हणत होत्या, 'गंगाराम, धीर धर, धीर धर".

गंगारामला लगेच 'साप व संगीत,' तसेच बाईसाहेबांनी सांगितलेल्या इतर गोष्टींची आठवण झाली. लगेच त्याने बासरी ओठाला लावली. तिच्या अत्यंत उंच तीव्र स्वरांनी खोली भरून गेली.वाघ केस ताठ करून उभा राहिला. तरी गंगारामने त्याच्यावर नजर रोखून ठेवली. वाघ मागें सरकला आणि गंगाराम पुढें झाला. वाघ मागें सरकत होता व गंगाराम पुढें होत होता. अशा तऱ्हेने बागेंतून आंबराईकडे

जाणाऱ्या रस्त्यावर ते आले. गंगाराम सावकाश चालत होता. त्याचे घारे डोळे वाघाच्या क्रूर निळ्या डोळ्यांवर खिळलेले होते. वाघाने पाऊल मागें घेतले कीं तो आपले पाऊल पुढें टाकीत होता.

अखेर गंगाराम आणि वाघ आंबराईपर्यंत आले. इतक्यांत त्याच्या खांद्या-वरून ठो ठो असे रायफलचे आवाज झाले. डरकाळी फोडीत व विव्हळत वाघाने हवेंत उडी घेतली. परंतु तो धाडकन गंगारामच्या पायाजवळ मरून पडला. त्याच्या धक्क्यानें गंगारामसुद्धां खालीं पडला.

नंतर गंगारामच्या लक्षात आलं. त्याच्याभोंवतीं मिस्टर व मिसेस स्मिथ, तसेच इतर शिकारी उभे होते. त्याच्या कानावर मिसेस स्मिथचे प्रेमळ शब्द पडले, "शूर गंगाराम! धाडसी गंगाराम !".

त्यानंतर गंगाराम सर्वांचाच आवडता मुलगा झाला. छोट्या गंगारामने न सांपडणाऱ्या वाघाला कुंपणापलीकडे हाकलीत नेले होते. त्याला लोक शूर शिकारी म्हणूं लागले. त्याचा त्याला खूप आनंद झाला. गंगारामच्या खोलींत तुम्हीं डोकावलांत तर तुम्हांला वाघाचे पट्ट्याचे पिवळे कातडे जमिनीवर अंथरलेलें दिसेल. तसेच त्या भयंकर वाघाबरोबरच्या आपल्या धाडसाची कथाही गंगाराम मोठ्या उत्साहाने तुम्हाला सांगेल.

# पूर्वेकडला तारा

नभीं दिसे तारा । तो दैदिप्यमान ।
आकर्षिले मन । विद्वानांचे ॥ १ ॥

म्हणती, "हा दावी । जन्म राजयाचा ।
चला शोध त्याचा । करूं त्वरें". ॥ २ ॥

निघाले ते मार्गा । आलें बेथ्लेहेमीं ।
पाहिला तो स्वामी । जगताचा ॥ ३ ॥

घेतले दर्शन.। वंदिलें चरण ।
अर्पिले सुवर्ण । ऊद, बोळ ॥ ४ ॥

धन्य ते विद्वान । शोधिती प्रभूला ।
जोडिती ज्ञानाला । खिरस्त भक्ति ॥ ५ ॥

दाव तुझा तारा, । तारका, सदया, ।
आणी आम्हां पायां । जवळीं तुझ्या.· ॥६॥

स. आ. पाठक.



# तुटलेला पूल

सुरेश संतापून म्हणाला, "आई, तूं त्या निर्वासित मुलांना घरांत कां घेतेस? "

"ते आपल्याला फार त्रास नाहीं द्यायचें. खरे म्हणजे मला ते आवडतात. चांगले आहेत ते. त्यांच्यापासून आपल्याला कांहीं शिकता येईल," त्याची आई म्हणाली.

"मला नाहीं शिकायचे त्यांच्यापासून", सुरेश रागांत म्हणाला. "मला ती मुलं या घरांत नकोत. ते माझी खेळणीं तोडतील आणि वाढदिवसाला मला बक्षिस मिळालेली विजेची आगगाडी मोडून टाकतील. मला माहीत आहे. नकोच बाबा ते इथें."

"मग त्यांना कुठें पाठवून द्यायचे?"

"अर्थात त्यांच्या घरी," सुरेश भडकून म्हणाला.

"पण त्यांना घरें कुठें आहेत? बहुतेक त्यांच्या घरांची राख झाली असेल !"

सुरेश क्षणभर विचारांत पडला.

"मग त्यांच्या आया कां नाहीं त्यांची काळजी घेत ?"

"त्यांना काळजी घ्यायला अर्थातच आवडेल. परंतु त्यांना शक्य होत नाहीं. त्या दुःखी आहेत. मुलांना जवळ ठेवूं शकत नाहींत. हे बघ बाळा, त्या कीं नाहीं, फार फार आजारी आहेत. त्या बऱ्या होईपर्यंत त्यांची काळजी वाहायचे आपल्यावर सोपविण्यांत आलें आहे," आई म्हणाली.

"पण आई, त्या मुलांनी घरभर धावपळ करावी आणि माझी खेळणीं वगैरे खराब करावी काय?"

"मलाही प्रथम तें आवडले नाहीं. परंतु आता मला त्याचे कांहीं वाटत नाही. हजारों माणसें आपल्या सर्वस्वाला मुकली आहेत. आणि बरे कां सुरेश, कालच मी कांहीं वाचलं. त्यामुळें मी या मुलांना ठेवायला तयार झालें."

"काय ? " सुरेशने विचारले.

"ती एक लहानशी गोष्ट होती, बाळा. दुःखाची! तूं ऐकशील तर तुला रडूं येईल."

"सांग मला ती गोष्ट."

"ती गोष्ट भारताच्या फाळणीच्या वेळीं घडली. हिंदू लोक पाकिस्तानांतील आपली घरें सोडून भारतांत पळ काढीत होते आणि मुसलमान लोक भारतांतील आपलीं घरें सोडून पाकिस्तानांत पळ काढीत होते. एका लहानशा खेड्यांत दोन मुले असलेली एक बाई होती. एक मूल होते पांच वर्षांचे, दुसरे होते आठ वर्षांचे. आई–मुलांनी घर सोडून पळ काढला व ती नदीच्या पुलापलिकडे आली. तिथें येताच आईला आठवलें कीं आपली ओळखपत्रें घरींच राहिली. त्यांत नांव, गांव आणि पत्ता असतो. त्यामुळे पोलिसांना ओळख पटते. तीच नाहींत तर कसें होईल? त्यांच्या अभावीं उगाच संकट नको म्हणून ती ओळखपत्रें आणण्यासाठी कांहीं वेळ मुलांना तिथेंच ठेवून घराकडे धावतगेली. तिने ती घरांतून घेतली व पुन्हां पुलाकडे धावत आली. तेवढ्यात भयंकर स्फोट झाला आणि पूल नदींत कोसळला. संतप्त जमावाने तो उडवून दिला होता.

"बिचाऱ्या आईला पलिकडे असलेली आपली लहान मुलें दिसत होती, परंतु ती त्यांच्याकडे पोहंचू शकत नव्हती. ती इतकी काळजींत पडली व भयभीत झाली की त्यामुळे बिचारी वेडी झाली."

आई बोलताना थांबली. तिला सुरेशच्या डोळ्यांत अश्रु दिसले.

आई म्हणाली, "ही कथा वाचली तेव्हांपासून त्या दोन मुलांचा सारखा मनांत विचार येतो. दोन एकाकी मुलें! पूल उडाल्यामुळे आपल्या आईला दुरावली! भयभीत होऊन पळणाऱ्या लोकांच्या लोंढ्यांत हरवली ! आईच्या शोधांत भटक भटक भटकली. त्यांना आई कधींच दिसली नाहीं ! मला वाटू लागलं जर कधीं ती मुले भेटतील तर मी त्यांना माझ्या घरांत आश्रय देईन. त्यांच्यावर ममता करीन. तूं नाहीं कां करणार, सुरेश? मला खात्री आहे, तूंहि त्यांच्यावर प्रेम करशील."

"हो अर्थात, मी त्यांना माझे सारे खेळ देईन, ते सापडलेंच पाहिजेत. तुला नाहीं कां तसें वाटत ?" सुरेश आईला म्हणाला.


"मला वाटते. परंतु ते सापडत नाहींत. तेव्हां मला वाटते, ज्या दुसऱ्या मुलांना अशाच मदतीची गरज आहे, त्यांच्यासाठीं तरी आपण कांहीं केलें पाहिजे."

"म्हणूनच तूं या मुलांना आपल्या घरीं आणलेस, होय ना?" सुरेश म्हणाला.

"होय. पूर्वीचे जीवन त्यांना पुन्हां प्राप्त व्हायचे नाहीं. यापुढे त्यांच्यासाठीं सगळेच कांहीं वेगळे असेल. कांहीं काळ त्यांना सुखी करण्याची आपल्याला संधि मिळाली आहे. आपण नको का प्रयत्न करायला ?"

"अर्थात् आपण प्रयत्न करायलाच हवा," सुरेश म्हणाला.

"मला वाटलेच कीं तूं असे म्हणशील," आई म्हणाली. "शिवाय या प्रकारच्या विचारसरणीने आपलेही जीवन उदात्त होईल."



# हवेवर विजय मिळविणारी मुलें

विलबर आणि ऑरविल राईट हे दोघे भाऊ. ते डेटन, ओहिओ, इथें राहात होते. ते सरळ व शांत स्वभावाचे होते. शांतताप्रिय, नम्र व विनयशील असे ते दोघेही होते. ते अत्यंत मेहनती होते. एखादी गोष्ट हातीं घेतली कीं ते ती तडीस नेत. निरुत्साही होऊन त्यांनी एखादी गोष्ट अर्धवटच सोडून दिली असे कधींच व्हायचेच नाहीं. यशप्राप्ति होईपर्यंत त्यांचे सतत प्रयत्न चालू असायचे. काम करीत असले किंवा खेळत असले तरी दोघे नेहमीं एकत्र असत. नव्या गोष्टी बनविण्याकडे त्यांचा कल असे. शाळा संपताच ते वडिलांच्या काम करायच्या खोलींत आपला वेळ घालवीत.

एकदां विलबर जेव्हां अकरा वर्षांचा आणि ऑरविल सात वर्षांचा होता तेव्हां त्यांच्या वडिलांनी त्यांच्यासाठीं एक नव्या प्रकारचे खेळणें आणले होते. त्याच्याभोंवतीं रबर गुंडाळलेला होता. तो ढिला सोडला की ते वर उडायचे. त्याला मुले 'बॅट' म्हणायची. ते वर छप्परापर्यंत उडायचे. तिथें कांहीं वेळ फडफड करायचे व मग खालीं जमिनीवर पडायचे. ते अशा तऱ्हेने चालते याची त्यांना गम्मत वाटली. त्यांनी त्या 'बॅट'चा अभ्यास केला व त्यासारखी दुसरी उडणारी खेळणीं बनविली.

दुसरा त्यांचा आवडता खेळ म्हणजे पतंग उडविणे हा होय. मुलगा आणि दोरा नसलेला उडणारा पतंग तयार केला गेला तर विमानासारखे कांहीं बनेल हा विचार तुमच्या मनांत कधीं तरी आला होता काय ? विलबर आणि ऑरविल यांच्या मनांत तो आला व त्यांनी हें कसें साधता येईल या दृष्टीने अभ्यास व प्रयत्न चालू ठेवला! ते जेव्हां मोठे झाले तेव्हां 'बॅट' आणि पतंग याबद्दलच्या रमणीय स्मृतीच तेवढ्या त्यांच्या मनांत उरल्या. तरी मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात त्याप्रमाणे त्यांना महत्त्व होते.

ते शाळेत होते तेव्हां मोटारी नव्हत्या. त्या काळांत जोराने पळणारी गाडी म्हणजे दुचाकी! तिच्या निर्मितीने लोक थक्क झाले होते. तिच्यासाठी अगदी वेडावून गेले होते. या बंधूंनाहि एक सायकल हवी होती. परंतु विकत घ्यायला त्यांच्याकडे पैसे नव्हते. तेव्हा त्यांनीच एक बनवून टाकली. ती दिसायला विचित्रच होती. परंतु ती चालत होती आणि त्यामुळे ते दोघेहि खूप झाले.

नंतर त्यांना वाटूं लागले कीं या सायकलपेक्षाहि जलद चालणारे कांहींतरी वाहन आपण बनवायला हवें. हवेंतून जाणारे यंत्र त्यांना घडवायचे होते. पुष्कळांनी त्यांना म्हटले कीं हीं गोष्ट अशक्य आहे. त्यांनी त्या मुलांना वेडयांत काढले. परंतु मुलांना त्याची पर्वा नव्हती. तसे यंत्र घडविता येईल अशी त्यांना खात्री होती व त्याप्रमाणे त्यांनी आपले प्रयत्न चालविले होते. नवे यंत्र बनविण्यासाठीं आवश्यक ते सामान घ्यायला त्यांना पैसे हवे होते. त्याकरिता त्यांनी सायकली दुरुस्त करण्याचे दुकान काढले.

दुकानाच्या मागच्या बाजूकडील छप्परांत त्यांनी विमानाची एक मूळ प्रतिमा बनविली. सर्वांनी त्यांची थट्टा केली. परंतु त्यांकडे त्या बंधूंनी मुळींच लक्ष दिलें नाहीं. युरोपांत कांहीं जण, तर अमेरिकेंत कांहीं जण याच विषयावर प्रयत्नशील आहेत हें ऐकून त्यांना प्रोत्साहन मिळत असे.

दुसरे संशोधक काय करीत आहेत ते जाणून घ्यायला दूर जाण्यास त्यांच्याकडे पैसे नव्हते. यंत्र बनविण्याचे शिक्षण घ्यायला महाविद्यालयांतहि त्यांना जाता आलें नव्हतें. तेव्हां त्यांनी स्वतंत्रपणेच आपला अभ्यास चालविला; त्यांनी पक्षांचाही अभ्यास केला. दिवसेंदिवस उताणें पडून त्यांनी उडणारे पक्षी न्याहाळले. अखेर त्यांनी जाणले कीं पक्षी हेच खरे जिवंत विमान आहे!

१९०० सालीं राईट बंधु उत्तर कॅरोलिनामधील कीट्टी हॉक येथें काम करूं लागले. त्यांच्या वडिलांनी त्यांना शक्य तितका पैसा दिला. आणि बहिणींनीहि मदत केली. वर्षां मागून वर्षे गेली. त्यांनी बायप्लेन बनविलें. त्यांत एकावर एक असे दोन पृष्ठभाग होते आणि त्यांच्यामध्यें जागा ठेवलेली होती. इतर संशोधकांना सरकारकडून हजारों डॉलर्स मिळत होते. पण राईट बंधुंनी मात्र आपला सारा खर्च डेटॉन येथील सायकलच्या दुकानावर मिळणाऱ्या पैशांतून चालविला.

१९०२ सालीं त्यांनी असे एक यंत्र बनविलें कीं त्या द्वारें मनुष्याला वर जाता येत असे, तरंगत पुढेहि जाता येई आणि पुन्हां खालीसुद्धां उतरता येई. आतापर्यंतच्या इतिहासांत ही घटना नवी होती.

आपल्या यशांतून स्फूर्ति घेऊन त्यांनी प्रयत्न सुरूंच ठेवले. जवळ जवळ एक वर्षानें विमान वळविता यावे ह्या त्यांच्या प्रयत्नाला यश आलें. आता आपले विमान हवेंत अधांतरी कसे ठेवावें हें त्यांना शोधून काढायचे होते. आणि त्यासाठीं त्यांनी कंबर कसली. त्यांनी पुन्हा पक्षांचा अभ्यास करायला सुरुवात केली. त्यांनी गरुड आणि बगळे पाहिले. त्यांनी बघितले कीं जेव्हां स्वत:ला सावरायचे असते तेव्हां पक्षी आपल्या पंखांची टोकें झुकवितात. मग त्यांनीही आपल्या विमानाच्या पंखांचे पृष्ठभाग असे बनविलें की जे पाहिजे तेव्हां वाकविता येतील आणि पुन्हां सरळहि करता येतील. अखेर त्यांचे विमान तयार झालें.

१९०९ सालीं त्यांनी सरकारला आपले विमान दाखविण्याची तयारी केली. ताशीं ४० मैल जाणाऱ्या विमानाला १,२५,००० रुपये देण्याची सरकारची तयारी होती आणि त्यापेक्षा ताशीं एक मैल अधिक वेगवान असणाऱ्या विमानाला १२,५०० रुपये अधिक देण्याचीहि त्यांनी तयारी दाखविली. तळ वॉशिंग्टन-पासून फारसा दूर नव्हता. ते दहा मैलांचे अंतर ऑरविल राईट चौदा मिनिटें पाच सेकंदांत उडून गेला. म्हणजे वेग ताशीं चाळीस मैलांपेक्षा जरा अधिक होता. सरकारने त्या विमानासाठी त्याला १,५०,००० रुपये मोबदला दिला.

वातमी हां हां म्हणता सर्व जगभर पसरली. त्यांच्या बहिणीनें ती तारेनें त्यांच्या वृद्ध वडिलांना कळविली. साऱ्या जगांत उत्सुकता जागृत झाली. सिनेटर, काँग्रेसवाले, आणि इतर सारेच जण तें दृश्य पाहायला उत्सुक झाले. त्याच दिवशीं सायंकाळी राईटने दुसरा उच्चांक प्रस्थापित केला. तो एक तास सात मिनिटें हवेंत राहिला. संध्याकाळीं त्याने दुसऱ्या दोघांना घेऊन विमान चालविलें. त्यांच्या या विजयाचे सर्वांनी स्वागत केले. अध्यक्षांनी त्यांचे हार्दिक अभिनंदन केले आणि इतर सर्व मोठमोठ्या लोकांनीं त्यांच्याभोवती गर्दी केली. अशक्य तें आता शक्य झालें होते.



"यमदूत आले आहेत माझ्यासाठीं," अली खिन्नपणें म्हणाला.

# यमदूत ?

उत्तर भारतांतील एका लहानश्या खेड्यांत त्यावेळी कॉलऱ्याची साथ आली होती. त्यामुळे तेथील एकच एक खिरश्चन डॉक्टर, डॉ. वॉटसनवर कामाचा खूपच भार पडला होता.

पण त्यांची हुषारी आणि प्रयत्न कांहीं फुकट गेले नाहींत. शेवटी साथ आटोक्यांत आली. आणि त्यांचा दवाखाना हळूंहळूं रिकामा होऊं लागला. सारे रोगी बरे होऊन घरीं परतूं लागले.

एके दिवशीं दवाखान्याच्या दाराशींच त्यांना त्यांचा जाडा जुडा भारतीय नोकर भेटला. तो त्यांना नमस्कार करून अदबीने उभा राहिला.

"कसे काय, महंमद?" डॉक्टरांनी विचारले. "मी जरा बाहेर जाऊन येतो. तोंवर तूं दवाखाना स्वच्छ करून ठेव."

"होय साहेब," तो म्हातारा म्हणाला ."पण अजून एक मुलगा, अली, दवाखान्यांत आहे, त्याचे काय? आजची रातहि तो जगू शकेल याची खात्री नाही!"

"अली! कां? काल तर तो चांगला बरा होता. तो आजही इथें राहील असे मला वाटत नव्हतें," डॉक्टर आश्चर्याने म्हणाले. "मी आतां जाऊन पाहतो त्याला!"

ते चटकन आंत गेले. एकदां रोग्यांनी गच्च भरलेला दवाखाना आतां रिकामा होता. दुसऱ्या टोकाच्या एका बिछान्यावर मात्र एक लहानसा काळा मुलगा भिंतीकडे तोंड करून पडला होता. त्याचे वय दहापर्यंत असावे. त्याचे डोळे मोठे असून केस काळे होते.

"काय रे?" डॉक्टरांनी स्मित करीत विचारले. "तूं अजून इथेंच कसा? तुला बरे नाहीं कां वाटत?"



"मला कधींच बरें वाटणार नाहीं," तो मुलगा खिन्नपणे म्हणाला. "यमदूत आले आहेत माझ्यासाठीं!" आणि त्याने आपल्या चेहऱ्यावर पांघरूण ओढून घेतले.

"यमदूत! मूर्ख आहेस!" डॉक्टर हसून म्हणाले, आणि त्याच्या बाजूला बसून त्यांनी त्याचा हात हातांत घतला. "इथें यमदूत वगैरे कोणी नाहीं. हे सारे मूर्ख-पणाचे चाळे आहेत हे महंमदही सांगेल तुला. होय कीं नाहीं, महंमद?" एवढें बोलून आपल्या कथनाला पुष्टि मिळेल या खात्रीनें त्यांनी महंमदकडे बघितले.

पण महंमदने मान हलवली, आणि तो खिन्नपणे म्हणाला, "ते खरें असायला हवे होते, साहेब! पण मुलगा म्हणतो तें खरे आहे. त्याच्यासाठी यमदूत आले आहेत. मी स्वत: त्यांना ऐकले आहे. तो मरणार हें निश्चित!"

"तूं एवढा मोठा असून, अशा पोरकट समजुतीवर विश्वास कसा ठेवतोस?" डॉक्टर म्हणाले, "अशाने पेशन्ट अधिक घाबरतोय. म्हणे यमदूत! पेशंटपुढे पुन्हां असे कांहीं बोलत जाऊं नकोस."

महंमद गप्प उभा राहिला. पण आपण उच्चारलेल्या शब्दांवर त्याचा पूर्ण विश्वास होता.

त्याच वेळीं दवाखान्याच्या छतावर कसला तरी आवाज झाला. जणूं कुणीतरी हळूंहळूं ते ठोठावत होते.

लहानगा अली घाबरून उठला आणि थरथर कापत म्हणाला, "यमदूत! ते पहा यमदूत आले आहेत. वाचवा! मला वाचवा डॉक्टर!" आणि तो एकदम डॉक्टरांना बिलगला.

"पाहिलंत, साहेब!" महंमद दु:खाने म्हणाला. "ते यमदूत आहेत. दुसरे कोण यावेळीं छतावर येणार वाजवायला? इथें आपल्याशिवाय दुसरें कुणीहि नाही, आणि बाहेर जाऊन पाहिले तर छतावरही कुणी दिसणार नाहीं. ते यमदूतच आहेत. आणि मुलगा मरणारच . . त्याचे नशिब!"

"यमदूत वगैरे कांहीं नाहीं. आणि अली मरणार नाहीं," डॉक्टर म्हणाले. "आणि या गोष्टींचा तपास लावल्याशिवाय मी राहणार नाहीं." मग अलीकडे वळून ते म्हणाले," अली, तूं घाबरूं नकोस. कांहीं होणार नाहीं तुला. देव आहे ना तुझ्या पाठीशीं? महंमद, तूं आता अलीसाठी छानपैकी बिस्किटे आणि पेय घेऊन ये पाहूं. आणि मी येईपर्यंत याच्याजवळच रहा. मी त्या यमदूतांना पकडून तुमच्या समोर घेऊन येणार आहे."

विस्किटांमुळे डॉक्टरांना अलीला सोडून जाण्यांत त्रास पडला नाहीं. त्यांनी दवाखान्याला चक्कर मारली. दवाखान्याभोंवतीं कांहींही नव्हतें. त्यांच्याभोवती वाळूचे मैदान पसरले होते. त्यांवर कुठेंही पावलांच्या खुणा दिसत नव्हत्या. फक्त फाटकापासून दवाखान्याच्या दारापर्यंतच काय त्या खुणा दिसत होत्या. पण ते उभे असतांनाच एक लहानसा दगड छतावरून गडगडत खाली आला. त्यानंतर दुसरा, तिसरा असे आणखी दगड आले. आंत अलीने या आवाजाला यमदूतांचा आवाज म्हटलें होते तर!

हे दगड येतात कुठून? वर कुणीही दिसत नव्हतें, पण तिथून वीस पंचवीस फुटांच्या अंतरावर एक झाड होते. आणि तिथे ती पाण्याची भांडी कशासाठीं होती? डॉक्टरांना नवल वाटले. त्या गर्द फांद्यांत कुणीतरी लपून बसणें शक्य होते. तिथें जाऊन पाहायलाच हवे. कांहीं क्षणांतच ते तेथे आले. तिथें पोहंचताच अलीच्याच वयाचा कुणी एक मुलगा झाडावरून उतरून खाली आला. डॉक्टरांपुढे येऊन त्याने उत्सुकतेने विचारले, "डॉक्टरसाहेब, अली बरा आहे ना? माझ्या खुणा त्याने ओळखल्या कां? काल मी बरेचदां छतावर दगड मारले, मी बाहेर आहे हें त्याला कळावे म्हणून. तो घरीं केव्हां जाणार?"

अशा रितीने तें रहस्य उलगडले. दुसऱ्याच दिवशी अली आपल्या मित्राबरोबर घरीं गेला. तो बरा झाला होता.

पण त्याचे कारण डॉक्टरांनी शोधून काढलेला यमदूत हेंच नव्हते कां? त्यामुळेच अली घाबरून गेला होता. बरेचदां मृत्युच्या भीतीनेच लोक स्वतःवर आजार ओढवून घेतात, नाहीं कां?

आपण किती सहजतेने फसूं शकतो हें ही गोष्ट सांगतें. म्हातारा नोकर आणि अली यांना कुणी तरी भूत-बीत जवळ असल्याची खात्री होती. असे हजारों लोक आज अंध समजुतीने फसविले जात आहेत. परंतु देवापासून माणसांना दूर नेऊं पाहणारी अनेक भुतें आहेत. त्यांच्या अस्तित्वाची आणि कुटिल कार्यांची कथा पवित्र शास्त्रांत (बायबलमध्यें) सांपडते.

# येई, प्रकाशा

येई, प्रकाशा, ह्या जगताच्या, अंतरीं माझ्या येई त्वरें ।
घालवीं हें मम तम तूं सारे, दावी मला तव सत्पथ रे ।। धृ ।।

चोंहीकडे अंधार पसरला, अंतरलो तव पायां रे ।
झालो मी दिङ्मुढ, दयाळा, जाऊं कुठें तें न कळे रे ।। १ ।।

पाड प्रकाशा, चालवी मातें, आंता तूंते विनवी रे ।
सकळ भविष्या दाव न याची, एक पदाची वाट पुरे ।। २ ।।

आजवरी तव मोल न कळलें, अनुसरलो स्वेच्छेला रे ।
काढियली म्यां वाट स्वतःची, विस्मर माझी पापें रे ।। ३ ।।

आजवरी मज अयाचिता त्वां चालविले भवकानीनि रे ।
चालविशील यापुढती, देवा, भाव तुझ्यावर माझा रे ।। ४ ।।

शरण तुला मी आलो, नाथा, उद्धरि आता पतिता रे ।
प्रकाशवी मम अंतर्यामा, मंगलधामा, खिरस्ता, रे ।। ५ ।।

(इंग्रजीतल्या 'Lead Kindly Light' या कार्डिनल न्यूमनच्या भक्तिगीताचे रूपांतर)

स. आ. पाठक.



# मनीषा

दयाळा, देई तव आशी ।
विनंति ही पदापाशी ।। धृ ।।

आम्हां पाप्यांस शोधिलें ।
आम्हां अंधांस नेत्र दिले ।
आम्हां दुबळ्यास निवडीले ।
दयाळा, आपुलें केले ।। १ ।।

आम्हां अज्ञां तुझें सत्य ।
कळविलें प्रेम पावित्र्य ।
पथ आम्हां दिव्य जीवनाचा ।
दयाळा, दाविला साचा ।। २ ।।

प्रभो, तव वचन समजाया ।
निजजनां नित्य शिकवाया ।
मनाची कर आता शुद्धि ।
दयाळा, देई बळ, बुद्धि ।। ३ ।।

जगां तव सत्य कळवाया ।
जगां तव प्रेम पटवाया ।
हराया दु:ख जे जगती ।
दयाळा, देई बळ, बुद्धि ।। ४ ।।

सदा मन हें तुला ध्यावो ।
सदा तनु ही तुला सेवो ।
सदा जीव हा तुला चाहो ।
असा वर, ईश्वरा, द्या हो ।। ५ ।।

स. आ. पाठक

# मी वनवासी

मी वनवासी । मम नेले प्रिय मातेसी ।। धृ ।।

'आई, आई' ही हांक ऐकता ।
आईसवें बालकांस बघता ।
जाणीव झणीं हो माझ्या चित्ता ।
मी वनवासी । मम नेले प्रिय मातेसी ।। १ ।।

कां, प्रभुराया सोडुनि सकलां ।
तूं माझ्या एकल्या आईला ।
अल्पावधितची घेऊनी गेला ? ।
मी वनवासी । मम नेले प्रिय मातेसी ।। १ ।।

आई, आई, कां टाकुनि मातें
गेली निघूनि तूं परलोकांतें ? ।
विस्मरली ना तव बाळातें ।
मी वनवासी । मम नेले प्रिय मातेसी ।। ३ ।।

देऊं, देऊं मी दोष कुणाला ? ।
तुला ? जगाला ? वा देवाला ? ।
किंवा माझ्या कमनशिबाला ? ।
मी वनवासी । मम नेले प्रिय मातेसी ।। ४ ।।

पुनरुत्थानीं, प्रेमळ माते, ।
डोळे भरुनि पाहीन तूंते ।
आलिंगिन तव पुण्य पदांते ।
सुखे मग राहूं । ईश्वरा निरंतर गाऊं ।। ५ ।।

स. आ. पाठक.

# माकडाची सुटका

"अहो गृहस्थ हो, तुमचे माकड इथेंच राहून गेले" असे ओरडत शशिकांत सर्कसच्या लोकांच्या मागून धावला. त्याच्याजवळ वानराचे पिल्लू होते. ते त्याला रस्त्याच्या बाजूला सांपडले होते.

"ते राहिले नाहीं. ते मरतच होते तेव्हां आम्हीं तें तिथें फेकून दिलें," सर्कसचा माणूस ओरडून म्हणाला.

शशिकांतला आपण काय ऐकतो हेंच कळेना. मरायला टेकलें म्हणून विचाऱ्या पिल्लाला रस्त्यावर टाकून दिले !

" शुश्रूषा कां करीत नाहीं त्याची ?" तो रागाने म्हणाला.

"त्या पिल्लाला बरें नाही. रात्रीपूर्वीच ते मरेल. कशाला ठेवायचे ते?"

शशिकांतच्या डोळ्यांत संताप आणि दया या दोहोंचे मिश्रण दिसत होते.

" या माकडाला अशा प्रकारें वागविले याचा तुम्हांला कधीतरी पश्चात्ताप झाल्याशिवाय राहणार नाहीं, साहेब!" असे म्हणून तो घराच्या दिशेने निघाला. त्याच्या हातीं अर्थात् माकड होते. धुळीने माखलेल्या रस्त्याची तप्तता त्याच्या अनवाणी पायांना झोंबत होती. पाण्याने भरलेल्या हौदाकडे जेव्हां तो आला तेव्हां काठावर बसून पाण्यांत पाय सोडण्यांत त्याला फार सुख वाटलें. मग त्याने माकडाला पाणी पाजले.

" हे बघ दोस्त! त्या सर्कसवाल्याला वाटत असेल की आपण मोठे शहाणे आहोत. परंतु माकड म्हणजे काय आहे तें मी त्याला दाखवून देणार आहे. मला वैद्यकीय उपचार वगैरे कांहीं अवगत नाहींत. पण आईला त्यांची खूप माहिती आहे," शशिकांत माकडाला म्हणाला. मग त्याने माकडाचे डोकें गार पाण्याने धुतले व खमिसामध्ये गुंडाळून त्याला घरीं आणलें.

शशिकांत घरीं आला. तो दमला होता. त्याला भूकही लागली होती. माकड जिवंत होते आणि ते मघापेक्षां अधिक सतेज दिसत होते.



"मला वाटतें, त्याला आता खायला प्यायला नि चांगली विश्रांति मिळाली कीं ते बरें होईल," ते दुबळे माकड पाहून शशिकांतची आई त्याला म्हणाली. "ते बिचारे सर्कसमधील आवाज आणि गोंधळ यामुळें थकून गेले आहे. मी त्याच्यासाठीं कांहीं खायला आणते. तूं त्याच्यासाठी गवताचा बिछाना तयार कर आणि जवळ स्वच्छ पाण्याचे भांडे ठेव. नंतर मग आपण त्याला अगदीं एकटें सोडलें पाहिजे."

आपल्या नव्या मित्रापासून दूर राहणे शशिकांतच्या अगदी जिवावर आले होते. दुसऱ्या दिवशीं तो नेहमीपेक्षां लवकरच उठला आणि माकड कसें आहे तें पाहायला गेला. त्याने हळूच आंत डोकावून पाहिलें. त्याचा छोटा दोस्त वरच्या आडव्या दांडीवर बसलेला दिसला तेव्हां त्याला झालेल्या आनंदाची कल्पनाच करणे बरें!

शशिकांतला इतका आनंद झाला की त्याने जोराने टाळ्या वाजविल्या. आणि माकड चीं चीं करीत पलिकडच्या कोपऱ्यांत पळाले!

"आपण माकडाला घाबरवून सोडलें हें कांहीं ठीक नाहीं. अशाने आपल्याला माकड पाळणे जमणार नाहीं," शशिकांतच्या मनांत विचार आला.

परंतु थोड्याच वेळांत त्यांची दोस्ती जमली.

अद्याप माकड संपूर्णपणें बरें झालेलें नव्हते. जवळ जवळ आठवडाभर शशिकांत व त्याची आई यांना माकडाची खूप शुश्रूषा करावी लागली होती. पण ते माकड जेव्हां पूर्ण बरे झाले तेव्हां शशिकांतला फार अभिमान वाटला. त्याने आपल्या माकडाचे नांव 'सुंदर' असे ठेवले. तो जाई तेथे सुंदर त्याच्याबरोबर कुत्र्याप्रमाणे असे. सुंदर पुढे इतका हुषार बनला की शशिकांत जें जें कांहीं बोलें तें तें त्याला कळे.

"आई, मला माकड फार फार हवे होते. ते असे अकस्मात मिळेल असे मला कधीं वाटलें नव्हतें."

"शशि, सर्कसवाला पुन्हां आला तर काय होईल याचा तूं कधीं विचार केला आहेस कां?" आईने त्याला गंभीरपणे प्रश्न केला.

शशिकांत आईकडे पाहत राहिला. मग तो म्हणाला, "आई, सुंदर मला सोडून त्या सर्कसवाल्याबरोबर जाईल असे वाटते तुला?"

"तसे नाहीं बाळा, परंतु त्याने कांहीं तुला माकड दिलेले नाहीं, हो ना?"

"पण त्याने ते टाकून दिले होते," शशिकांत उत्तरला. "मी सुंदरचा प्राण वाचविला तेव्हा त्याच्यावर माझाच हक्क आहे असें मला वाटते."

"अजून विचार कर, बाळा, विचार कर."

शशिकांतनें खूप विचार केला व अखेरीस त्याला वाटले की सुंदरला सर्कसच्या मालकाकडे सुपूर्तच करावें लागेल.

परंतु त्यातूनही एक मार्ग निघेल असे त्याच्या मनांत येऊन तो पैसे जमा करूं लागला. अधिक पैसे मिळविण्याकरितां तो निरनिराळी लहान लहान कामेंही करूं लागला. पुरेसे पैसे जमा झाले की सुंदरला विकत घ्यायचे असे त्याने ठरविले.

एक वर्ष केव्हां गेले हे त्याचे त्यालाच कळले नाहीं. सर्कस यायचे दिवस आले तेव्हां त्याला भीति वाटू लागली. आपल्या दोस्ताची व आपली फारकत होणार. आपण त्याला इतके खेळ शिकविले आणि आता तो आपल्याला दुरावणार या विचाराने तो अस्वस्थ झाला.

सर्कसच्या दिशेने चालतांना त्याच्या डोळयांत अश्रु जमा झाले. त्याच्या खांद्यावर सुंदर बसला होता. त्याला तो म्हणत होता, "सुंदर, तूं इतका हुषार आहेस हें मालकानें पाहिल्यावर तो तुला सोडणार नाहीं!"

सुंदरला त्या अश्रूंचा अर्थ कांहीं कळला नाहीं. परंतु खेडयाकडे चाललेल्या या आगळया सहलीमुळे तो आनंदून बडबडत होता.

शशिकांतची कथा ऐकल्यानंतर सर्कसचा मालक म्हणाला, "बाळ, ज्या माणसाने या माकडाला टाकून दिले त्याला मी खूप रागावलो. मी अशा गोष्टी शक्य तोंवर होऊं देत नाहीं. हेच ते आजारी माकड तर! खरेच त्याला जिवंत ठेवणारा तूं अत्यंत हुषार मुलगा आहेस. तूं आता त्याचे काय करणार आहेस बरे?"

"ते तुमचे आहे, साहेब," शशिकांत भरलेल्या आवाजाने म्हणाला. "ते फारच चांगले माकड आहे आणि त्याचा फार चांगल्या रीतीनें सांभाळ करायला हवा."

हे बोलत असतांना त्याच्या कंठांतून हुंदका आला आणि इतका वेळ मनांत योजून ठेवलेला एकही शब्द त्याला बोलता येईना.

"याला करामती येतात कां?"

सुंदरने कांहीं करामती करून दाखविल्यावर मालक म्हणाला, "माकड पण माकड आहे हें! या माकडाचे तुला किती पैसे हवें ?"

"माकडाचे पैसे?" शशिकांत उद्गारला. थोडा वेळ थांबून मग तो अडखळत म्हणाला, "साहेब, तें माझें आहे असेच जर तुम्हांला वाटते तर मग ते माझ्याकडेच राहूं द्या. मला एवढेंच हवें! साहेब, तो माझा दोस्त आहे. आणि मी – मी दोस्ताला विकणार नाहीं. मला पैसे वगैरे कांहीं नको. मला फक्त सुंदर हवाय्." आणि त्याने सुंदरच्या अंगरख्यांत तोंड खुपसलें.

सर्कसच्या मालकाने शशिकांतला खांद्यावर थोपटीत म्हटलें, "बाळ, तूं बरोबर आहेस. जगांत मित्राला विकत घेण्याइतकी पैशाची ताकद नाहीं. हे माकड तूंच ठेव आणि तुम्हीं दोघे मजेंत रहा !"



आरोग्य संवर्धक

# आरोग्य संवर्धकांचे सम्मेलन

आज रेणुका आणि रविंद्र यांनी सम्मेलन आयोजित केले आहे. जवळपास राहाणाऱ्या सर्व आरोग्यसंवर्धकांना त्यांनी पाचारण केले आहे. हे आरोग्यसंवर्धक तुमचें मित्र आहेत. ते तुमचा एकही दिवस बिघडविणार नाहींत. तुम्हांला आवडणार नाहीं अशी एकही गोष्ट त्यांच्याकडून घडणार नाहीं. सर्व काम कसें सोपे होईल हेच ते पाहातील. ते जिथें जिथें जातील तिथे तिथें आनंदी वातावरणच निर्माण करतील.

पण हे आरोग्य संवर्धक कोण आहेत हें तुम्हांला ठाऊक आहे ना ? नाहीं? पण हरकत नाहीं. ते आल्याबरोबर मी तुम्हांला त्यांची ओळख करून देईन.

हे बघा प्रथम पाणी येत आहे. " पाणी आणि भरपूर पाणी" हे त्याचे ब्रीदवाक्य आहे. जेवणापूर्वी अर्धा तास एक ग्लास पाणी तुमच्याकडे येते आणि प्रत्येक जेवणानंतर दोन तासांनी पुन्हां येते. शिवाय प्रत्येक जेवणापूर्वी थोडेसे गरम पाणी हात धुवायला येतेच. रोज सकाळीं उठल्यानंतर तोंड धुवायला आणि आंघोळ करायला पुष्कळसे गार पाणी हवेच असते. हें सारे पाणी तुम्हांला पुरवायचे हेच प्रियंवदाचे काम !

आता हा बघा बिनाका टूथब्रश यत आहे. तो लहानसा अन् जरा भित्रा आहे. तो पुढें कधीं येतच नाहीं आपणहून. म्हणूनच त्याच्याकडे बरेचदां आपले दुर्लक्ष होते. पण तो फार प्रामाणिक आहे. त्याची आपणास फार मदत होते. त्याची त्याच्या साऱ्या मित्रांशीं दिवसांतून कमींत कमी दोनदां भेट होते. सकाळीं न्याहारीपूर्वी ..... आणि रात्रीच्या जेवणानंतर. त्याची भेट जर तुम्हीं चुकवली तर त्यांत तुमचेच नुकसान असते.

त्यानंतर जोडीने येत आहे पंजाबीराव गहूं, आणि शुद्ध कामधेनु दूध. त्यांची जागा जेवतांना नेहमीं तुमच्या शेजारी असते. आणि त्यांचा हा मान योग्यच आहे. कारण ते तुमच्या साऱ्या शरीराला मदत करतात. पंजाबीराव गव्हांला मागे ढकलून भिकारदास या केकशी तुम्हीं मैत्री करूं नका. त्याची पांढरी कॉलर नेहमी ताठ असली तरीही. आणि कामधेनु दुधाऐवजी जर तुम्ही ती दुष्ट जोडी जवळ केली तर सर्वनाश झालाच म्हणून समजा. चहा आणि कॉफी हे तुमचे मोठे शत्रू आहेत.

आता हे शर्मिला सफरचंद येत आहे. काय, शर्मिला, कशीं काय आहेस ? ही चांगली मैत्रिण आहे. तिचे ब्रीद माहित आहे ?" रोज एक सफरचंद, डॉक्टरांना दार वंद." साऱ्या मुलामुलींनी हिच्याशी मैत्री केली पाहिजे. अनेकदां आपल्यावर हल्ला करणाऱ्या रोगजंतुंना ही नष्ट करीत असते.

शिवाय भाजी कुटुंबही आपल्या सम्मेलनाला शोभा आणणार आहे. सुशीला पालक आपला घोळदार हिरवा रेशमी झगा घालून नेहमी आपल्या शेजारीच उभी असते. ती फार प्रसिद्ध आहे. तिच्याशिवाय आपल्या सम्मेलनाला शोभाच येणार नाही. मी एकदां ऐकले होते कीं ती लहान मुलींचे केस कुरळे करून देते म्हणून. पण ते तेवढेच खरें नाहीं. ती त्यापेक्षाही अधिक कांहीं करते. ती आपले रक्त लाल आणि शुद्ध ठेवते आणि आपले दांत शुभ्र आणि मजवूत ठेवते.

सुनीति गाजर तिच्या नारिंगी झग्यांत कशी दिसते. तूं आलीस हें पाहून आम्हांला खूप आनंद झाला हं, सुनीति! तुझ्यावद्दल इथें जमलेल्या सर्व मंडळींना कळावे अशी माझी इच्छा आहे. तूंसुद्धां रक्त शुद्ध आणि चांगले ठेवण्यास मदत करतेस.

प्रेमजीत वटाटासुद्धां याच भाजी कुटुंबांतला. प्रेमजीत हा इतका ओळखीचा आणि जवळचा आहे की त्याची ओळख करून द्यायची आवश्यकताच नाहीं. तो नेहमी आनंदी असतो आणि तो आपल्याला शरीर लठ्ठ आणि गोंडस ठेवायला नेहमीं मदत करतो.

आणि ही विमल उसळ एकटीच का येत आहे? "तुझी लहान बहीण, निर्मला वरण, कुठाय् गं ? आणि तुझा लहान भाऊ, सुभाष वाटाणा ? "

" आई म्हणाली की आमच्यापैकीं एकानेच तुमच्या सम्मेलनाला जाणे वरें म्हणून."

"तिचे बरोवरच आहे. पण तू सोबत कुणाला आणले असतेस तर फारसें बिघडले नसते. शिवाय तुमचा गोंधळही त्या भाजीच्या मुलांसारखा नसतो. आमचे हे सम्मेलन मात्र तुझ्याविना अगदीच सुने वाटले असते, नाहीं कां? 'महत्त्वाच्या गोष्टी लहानश्या पुडींतच दडलेल्या असतात ' हें तूंच एकदा म्हटले होते, नाहीं कां? तें अगदीं बरोबर आहे वघ. थोडेसे कडधान्य दिवसांतून एकदां खाल्लें तरी पुरे असते. तूं लहानशी असलीस तरी आम्हांला खूप शक्ति देतेस. आम्हीं तुझें हार्दिक स्वागत करतो आमच्या सम्मेलनात ! आणि हें बघ, सर्व मुलांमुलींचे तुझ्यावद्दलचें मत चांगले होऊं दे. तुझी शक्ति त्यांना मिळणे फार आवश्यक आहे."

आता हे दोन लहान मित्र पाहा. मुलांनो, यांना भेटा पाहूं. हा मधूकर जर्दाळू आणि हा आनंद वदाम ! ते प्रतिष्ठित दिसतात, नाहीं कां ? आणि त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं, कारण त्यांना फार मोठे काम करायचे असते. त्यामुळे त्यांना जरा अभिमान वाटणे साहजिकच आहे. ते आपले शरीर सशक्त ठेवतात. शिवाय आपले स्नायू बळकट करतात.

दुसरा आपल्या सम्मेलनास येणारा मित्र म्हणजे हनुमानराव व्यायाम! कधीं कधीं त्याला प्रामाणिक श्रमही म्हणतात. तो आपल्याला बऱ्याच गंमतीदार गोष्टी शिकवितो. वागेंत तो आपल्या सोवत असला तर फारच छान! त्याला एक लहान वहीण आहे. तिचं नांव सुहासिनी खेळकर. जेव्हां आपली त्यांची भेट होते तेव्हां आपले रक्ताभिसरण अधिक चांगलें होते.

हनुमानराव व्यायाम आपल्या स्नायूंना पडलेल्या गांठीं काढून टाकतो. तो प्राणवायूचा भरपूर पुरवठा होण्यास मदत करतो आणि आपल्या शरीरांतली भट्टी पेटत ठेवतो. त्यामुळेंच आपल्या शरीराला ऊव मिळते. नंतर तो आपल्या शरीराच्या सगळ्या लहान खिडक्या उघडतो आणि घामाच्या रूपाने सारी घाण बाहेर काढतो. त्यामुळें आपले शरीर स्वच्छ होते. जर आपण रोज एक तास यांच्यासोवत घालविला तर आपले शरीर स्वच्छ आणि सशक्त होते आणि आळस आपल्याला सतावीत नाहीं.

आता आपली शेवटची मैत्रिण म्हणजे झोपाळू शांता. आणि झोपाळू शांता नेहमी आपल्यासोबत टवटवीतपणा घेऊन येत असते. ती आपली दयाळू मैत्रिण आहे. आपण तिला बोलावलें तर ती नेहमीं येईल. जर आपण रात्रीं खूप वेळपर्यंत जागत वसलो तर तिचे आपले भांडण होण्याची शक्यता असते. आणि मग आपल्या साऱ्याच गोष्टी बिघडतात. कधीं कधीं ती सरळ निघून जाते. शिवाय तिचे इतर सवंगडीही आपल्याला त्यावद्दल शिक्षा करतात.

मुलांनो, या सर्वांशी मैत्री करण्याचा एक मार्ग म्हणजे या सर्वांना आपल्या घरी बोलावणें, आणि त्यांना मित्र म्हणून मान देणें. आरोग्य तुमचे सोबती व्हायला नेहमीच तयार असते. पण त्याच्या मैत्रीची गोडी तुम्हांला वर्णन करून कुणीं सांगू शकणार नाहीं. कांहीं गोष्टींची चव स्वत: घेतल्याशिवाय कळत नसते. तुमच्यासाठीं दुसऱ्या कुणीं त्याची चव घेवून चालत नाहीं. तीं तुम्हींच घ्यायला हवी. आरोग्याचंही तसंच असतं. तें असण्यामुळें होणारे सुख अनुभवायचे असेल तर तें तुम्हीं स्वत: प्रयत्नांनी मिळविले पाहिजे.



स्वर्गाचें राज्य

# प्रभू येशूने धन्य ठरविलेलें लोक

जे आत्म्याने 'दीन' ते धन्य, कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे.

जे शोक करीत आहेत ते धन्य कारण त्यांचे सांत्वन करण्यांत येईल.

जे सौम्य ते धन्य कारण ते पृथ्वीचे वतन भोगतील.

जे नीतिमत्वाचे भुकेलेले व तान्हेले ते धन्य, कारण ते तृप्त होतील.

जे दयाळू ते धन्य कारण त्यांच्यावर दया होईल.

जे अंतःकरणाने शुद्ध ते धन्य कारण ते देवाला पाहतील.

जे शांति करणारे ते धन्य कारण त्यांना देवाची मुलें म्हणतील.

नीतिमत्वाकरितां ज्यांचा छळ झाला आहे ते धन्य कारण स्वर्गाचे राज्य त्यांचे आहे.

माझ्यामुळें जेव्हां लोक तुमची निंदा व छळ करितील आणि तुमच्या विरुद्ध सर्व प्रकारचे वाईट लबाडीने बोलतील तेव्हां तुम्ही धन्य. आनंद करा, उल्हास करा, कारण स्वर्गात तुमचे प्रतिफळ मोठें आहे, कारण तुमच्यापूर्वी जे संदेष्टे होऊन गेले त्यांचा त्यांनी तसाच छळ केला.

—बायबलमधील मत्तयकृत शुभवर्तमान, अध्याय ५, वचनें ३–११



आपले जीवन नीतिने, विश्वासूपणें व जनसेवेंत घालवायचा मॉरीसने दृढनिश्चय केला होता.

# लहानगी कोंबडी

एकदां तर ती नुसती पिसांचा एक गुबगुबीत चेंडू होती. चिमण्यांची पिल्लें जशी 'चिऊं, चिऊं' करतात तशी ती "पीप ! पीप !" करायची. ती जरी आपल्या देशांतली नसली, आणि दूरवरच्या फ्रान्स देशांमधली असली तरी एक वैशिष्टच सोडलें तर ती एक गुबगुबीत लहानशी कोंबडी होती.

हं, तर ती लहानगी कोंबडी सर्वसामान्य कोंबड्यासारखीच होती; जसे एलियाला अन्न पुरविणारे कावळे सर्वसामान्य कावळ्यासारखेच होते ना, तसे! जर देवाने एलियाला अन्न पुरविण्यासाठी त्यांचा उपयोग करून घेतला नसता तर आपल्याला त्यांच्याविषयी कांहीं कळलेंसुद्धां नसते. त्याप्रमाणेच या लहानग्या कोंबडीचा उपयोग एका मुलाचा प्राण वाचविण्यासाठीं झाला.

जसजशीं ती मोठी होऊ लागली तसतसें तिच्या आजूबाजूच्या शांत खेडवळ वातावरणांत बदल होऊं लागला. बाँबचे आवाज कानठळ्या बसवूं लागले. दुर्दैवी मुलांमुलींच्या, स्त्री–पुरुषांच्या किंकाळ्या ऐकूं येऊं लागल्या. ही लहानगी कोंबडी जर मनुष्य असती तर तिला कळले असते कीं युद्ध पेटले म्हणून.

पण तिला तें कळलें नाहीं. तिला फक्त एवढेंच कळत होते की तिचीं जुनी घरटीं सारखी मोडली जात आहेत, आणि अंडी घालण्यासाठीं तिला सारख्या नव्या नव्या जागा शोधाव्या लागत आहेत. आपल्याभोंवतीं रोज होणारे तालबद्ध आवाज सैनिकांच्या तालमीचे आहेत नि त्यांतच मॉरीससुद्धा सामील आहे, याची तिला गंधावार्ताही नव्हती.

मॉरीसने सैन्यांत भरती होण्यापूर्वीच येशू ख्रिस्ताबद्दल ऐकलें होते. येशू पुन्हां लवकरच पृथ्वीवर येणार आहे हें ही त्याला कळले होते. बायबलमधील बऱ्याचशा गोष्टी त्याने समजून घेतल्या होत्या.त्याने मनांतच पक्के ठरविलें होते कीं प्रभू येशू जेव्हां परत येईल आणि सर्व भाग्यवंतांना आपल्यासोबत स्वर्गात नेईल, तेव्हां त्या भाग्यवंत मंडळीमध्यें त्याचासुद्धां समावेश असेल. त्याकरता आपले जीवन देवकृपेने नीतीनें, विश्वासूपणें व जनसेवेंत घालवायचा त्याने दृढनिश्चय केला.



लहानग्या कोंबडीने मॉरिसचा जीव वाचविला.

एके दिवशीं त्या लहानग्या कोंबडीच्या घराजवळ बाँबचा एक तुकडा लागून मॉरीस जखमी झाला. बिचारा एका खळग्यांत पडला. रक्तस्त्राव होत होता आणि असहाय्यपणें तो पडला होता. चहूकडें गोळ्या उडत होत्या. तो ती सबंध रात्र तिथेंच पडून राहिला. कुणीही त्याच्या मदतीला येऊ शकले नाहीं. भूक लागल्याने आणि रक्तस्त्राव झाल्याने तो अतिशय अशक्त झाला होता. त्याच्या पिशवींत थोडेसे अन्न होते. पण आपल्या पाठीवरून पिशवी काढून कांहीं खावें इतकेही त्राण त्याच्यांत उरले नव्हतें.

सकाळीं लहानगी कोंबडी जवळून जात होती. तिने एक मोठी विचित्र गोष्ट केली. बिचारा मॉरीस ! भुकेने आणि रक्तस्त्रावाने आपण मरणार असेच त्याला वाटत होते. त्याने त्या कोंबडीला जवळ येतांना पाहिले. आपल्यासाठी नवे घरटें शोधण्याऐवजी ती मॉरीसच्या हाताजवळच थांबली आणि त्याच्या हातांतच तिने अंडे घातले.

मॉरीसने हळूच तें अंडे घेतले आणि खाऊन टाकलें. आणि त्या लहानग्या कोंबडीने त्यानंतर पाच दिवस, रोज सकाळीं नेमाने मॉरीसच्या हातांतच अंडी घातली. पाच दिवसांनी युद्ध थांबलें.

अशा रीतीने त्या लहानग्या कोंबडीने मॉरीसचा प्राण वाचविला. मॉरीसने परमेश्वराचे आभार मानिले. त्याला स्वानुभवाने पटले की देव त्याच्या लेकरांस कधींच टाकीत नाहीं, तर त्यांच्या संकटसमयीं त्यांच्या मदतीला तो धावून जातो. जसा एलियाचा प्राण कावळ्यांकडून, तसा मॉरीसचा जीव देवाने लहानग्या कोंबडीकडून वाचविला. पुढे मॉरीस देवाचा एकनिष्ठ सेवक झाला.



"मीच उत्तम मेंढपाळ आहे; उत्तम मेंढपाळ मेंढरांकरिता आपला प्राण देतो." (बायबल)

# माझा देव आणि मी

१ परमेश्वर माझा मेंढपाळ आहे.
मला कांही उणें पडणार नाही.

२ तो मला हिरव्यागार कुरणांत बसवितो.
तो मला शांत पाण्याजवळ नेतो.

३ तो माझा जीव ताजातवाना करितो.
तो आपल्या नामास्तव मला नीतिमार्गाने चालवितो.

४ मत्यूच्छायेच्या दरीतूनही मी जात असलो तरी अरिष्टांस भिणार नाही.
कारण तूं मजबरोबर आहेस. तुझी आंकडी व तुझी काठी मला धीर देतात.

५ तूं माझ्या शत्रूंच्या देखत मजपुढें ताट वाढितोस, तूं माझ्या डोक्याला तेलाचा अभ्यंग करितोस, माझें पात्र कांठोकांठ भरलें आहे.

६ खरोखर माझ्या आयुष्याचे सर्व दिवस मला कल्याण व दया ही लाभतील.
आणि परमेश्वराच्या घरांत मी चिरकाल राहीन.

—बायबलमधील दाविद राजाचें स्तोत्र २३



लहानग्या विजयला नीता खूप आवडायची.

१६८५८
प्रा-आ

# आनंदाची विभागणी

नीता नाण्यांचा ढीग करून ठेवीत होती, आणि नितीन् दहा पैशांची आणि पंचवीस पैशांची नाणीं वेगवेगळी काढीत होता.

"आपल्याकडे माझ्यासाठीं चेंडू घेण्यासाठीं भरपूर पैसे आहेत," तो हसून म्हणाला, "आणि तुझ्या बाहुलीसाठींसुद्धां हं नीता!"

आई मुलांकडे पाहून हंसली. ते बहिणभाऊ बरेच दिवस पैसे जमवीत होते. त्यांनी वडिलांना बागेंत मदत केली होती. शिवाय शेजाऱ्यापाजाऱ्यांची लहान लहान कामेंही केली होती. आणि आता त्यांना त्या पैशांतून हवीं तीं खेळणीं घेता येणार होती.

"आई, तूं नेशील कां आम्हांला बाजारांत?" नितीन्ने उत्सुकतेने विचारलें.

आईने खिडकीबाहेर डोकावलें. आकाश काळे कुळकुळीत दिसत होते. शिवाय वाराही वाहत होता. पण आईलासुद्धां बाजारांत कांहीं काम होते म्हणून ती म्हणाली, "नेईन हं!"

जेवण झाल्यावर लगेच मुलें आईबरोबर बाजाराला निघाली. आईकडे एक मोठी पिशवी होती. नीताजवळ तिची लहानशी पर्स होती आणि नितीन्ने आपली करड्या रंगाची मनीबॅग घट्ट धरून ठेवली होती.

"आपण गांगुली मावशीकडे एक मिनिटभर जाऊं या," आई मुलांना म्हणाली. "त्या आजारी आहेत. त्यांना कांहीं हवे-नको तें पहायला हवें, नाहीं कां?"

एका लहानशा लाजाळू मुलीने दार उघडल आणि ती म्हणाली, "या, आंत या ना!"

नीताने त्या लहानशा खोलीभर नजर फिरविली. आरामखुर्चीत बसलेल्या आजारी बाईकडे पाहून तिने स्मित केले आणि मग ती त्यांच्या लहानशा गोड बाळाबरोबर खेळण्यासाठी शेजारच्या खोलींत गेली.

लहानग्या विजयला नीता खूप आवडायची. त्याने तिच्याकडे पाहून आपले हात उचावले. लहानग्या विजयंबरोबर आणि लाजाळू सिंधूबरोबर खेळणें तिला फार आवडत असे.

उद्या विजयचा वाढदिवस आहे हें तिला कळलें. तो उद्या चार वर्षांचा होणार. "आता विजयला चार मेणवत्त्या लावलेला केक मिळणार ! शिवाय सोबत फळे, जेली आणि मिष्टान्न असेलच," नीता आपला वाढदिवस आठवीत म्हणाली.

पण विजयने मान हलवली. "उंहूं, विजयला वरणभात मिळणार. विजयला वरणभातच आवडतो!"

"शूऽऽविजय!" त्याच्या मोठ्या वहिणीने त्याला गप्प केले. शरमेने तिचे गाल लाल झाले होते.

त्याच वेळीं आईने हाक मारली, "चला मुलांनो!"

नीता आणि नितीन् आपल्या आईसोबत रस्त्याने चालू लागलें. ते दोघेही लहानग्या विजयचा विचार करीत होते. विजयला वाढदिवशीं कांहींच विशेष मिळणार नव्हतें. कारण चांगल्या चांगल्या गोष्टी आणायला त्याला वडील नव्हते आणि त्याची आई आजारी होती.

नीताच्या मनांत विचार आला, "माझ्या पैशांतून मी विजयला कांहीं भेट देऊ शकेन !"

आणि नितीन् विचार करीत होता,"मी तर विजयला आणि सिंधूला छानपैकी खायला देणार. विचाऱ्यांना कधींच चांगले पदार्थ खायला मिळत नसतील!"

"मुलांनो, तुम्हीं असे गप्प कां ?" आईने विचारले. पण त्यांनी जेव्हां कारण सांगितले तेव्हा तिला अतिशय आनंद झाला. "तुमच्या निस्वार्थी आनंदांत मलापण वाटा द्या हं! मी तुम्हांला मदत करीन!"

विजय, सिंधू आणि त्यांच्या आईसाठी वेगवेगळ्या प्रकारच्या खाद्यवस्तु आणि भेटी विकत घेतांना नीता आणि नितीन्‌ला खूप गंमत वाटत होती. शिवाय वडिलांनी मोठे कोळशाचें पोतें त्यांच्याकडे पाठवून निस्वार्थी आनंदांतला आपला वाटाही पुरा केला. "हे तुमचे वाढदिवसाचे जेवण शिजविण्यासाठीं हं!" ते गंमतीने म्हणाले.

दुसऱ्या दिवशी नीता, नितीन् व त्यांच्या आईने गरीब गांगुली कुटुंबासाठीं उत्तम जेवण तयार केले. नीता आणि नितीन्‌ला आपले आईवडिल नाताळासाठी काय काय बेत करीत आहेत हें ठाऊक नव्हते. असतें तर त्यांच्या आतांच्या आनंदांत केवढी भर पडली असती! नाताळ काही आता फारसा दूर नव्हता. वडिलांच्या मनांत नितीन्‌साठी मोठा चेंडू आणायचे होते, आणि आईचा विचार होता नीताला एक सुंदर बाहुली देण्याचा!"

# लहान मूर्ति, थोर कीर्ति

सुमारे तीनशें वर्षांपूर्वी, कुणी एक क्रूर माणूस आफ्रिकेला गेला आणि त्याने तिथल्या कांहीं गरीब लोकांना पकडून जबरीने आपल्या जहाजावर घेतले आणि मग तो त्यांना घेऊन दूर अटलांटिक समुद्र ओलांडून अमेरिकेंत गेला. तेथें त्याने त्यांना गुलाम म्हणून विकलें. शेतावरची आणि बागेंतली कामें करवून घेण्यासाठीं गोऱ्या लोकांनी त्यांना विकत घेतले.

असे आपल्या घरापासून, आप्तेष्टांपासून दूर नेऊन विकण्यांत यावे किती क्रूरपणाचे होते ! त्यांना कधींच परतता येत नसे. वर्षानुवर्षे जहाजें भरभरून या बिचाऱ्या निग्रो लोकांना पकडून अमेरिकेंत नेण्यांत येई आणि गुलाम म्हणून बाजारात त्यांची विक्री होई. आज अमेरिकेंत अकरा दशलक्ष निग्रो लोक आहेत.

अनेक वर्षांपूर्वी त्यांचे पूर्वज गुलाम होते. त्यांच्यापैकीं बरेंच कापसाच्या शेतांत वा उसाच्या मळ्यांत काम करीत. अजूनहि दक्षिण अमेरिकेंतील अनेक चित्रांमधून हे काळे निग्रो लोक शेतांत काम करतांना दिसून येतात.

अशाच एका लहान गुलाम मुलाचे नांव बुकर होते.

हे विचित्र नांव त्याला कसें मिळाले कुणास ठाऊक ! बुकर आपल्या आईबरोबर व्हर्जिनिया नांवाच्या प्रांतात राहत असे. त्याच्या काळांत अमेरिकेंतील अनेक गोरे लोक, काळ्या लोकांच्या गुलाम म्हणून करण्यांत येणाऱ्या व्यापाराला विरोध करूं लागले होते. इतकें कीं शेवटीं दक्षिण आणि उत्तर विभागांमध्यें याच प्रश्नावर मोठें युद्ध पेटलें. या युद्धाला अमेरिकेच्या इतिहासांत " यादवी युद्ध " म्हणतात.

हें युद्ध चालू असतांना एके दिवशीं सकाळीं बुकर उठला तेव्हां त्याला दिसलें कीं त्याची आई अध्यक्ष लिंकन यांच्या सैन्याला विजय मिळून आपली व आपल्या मुलाची गुलामगिरींतून सुटका व्हावी म्हणून परमेश्वराची याचना करीत होती. त्यानंतर कांहीं दिवसांनी हें युद्ध संपले आणि अमेरिकेंतील निग्रो लोकांची गुलामगिरी कायद्याने रद्द करण्यांत आली. बुकरच्या आईची प्रार्थना देवाने ऐकली होती. बुकर आणि त्याची आई यांना स्वातंत्र्य प्राप्त झालें.



लहानग्या बुकरला लिहिता वाचता येत नव्हतें. पण त्याला शिकण्याची खूप इच्छा होती. त्याला दिवसा शाळेंत जाता येत नसे. कारण तो सहा वर्षाचा असला तरी त्याला उपजीविकेसाठीं काम करावें लागे. पण तो संध्याकाळीं खेळण्यांत वेळ घालविण्याऐवजीं अभ्यास करी. हळूंहळूं त्याला भाषेची मुळाक्षरें येऊं लागली. खूप प्रयत्नांनंतर त्याला वाचतां येऊ लागले.

बुकर जेथें राहात होता त्या गांवांत चांगली शाळाच नव्हती. म्हणून तेराव्या वर्षी त्याने आपल्या घरापासून दूर हॅम्पटन शहरीं शाळेला जाण्याचे ठरविलें. पण त्याच्याजवळ पैसे अगदीच कमी होते आणि हॅम्प्टन शहर तेथून पांचशे मैल दूर होते.

बरच दिवस पायीं चालून आणि लोकांच्या विनवण्या करीत गाडीने प्रवास करीत, एके दिवशीं तो हॅम्पटन शहरांत पोहचला. तो अतिशय थकलेला आणि भुकेलेला होता. शिवाय जवळ पैसेहि नव्हते,आणि एवढयां मोठया शहरांत आपण एकटेंच आहोत या विचाराने तो घाबरून गेला होता.

काय करावें हें कळत नसल्याने तो मध्यरात्रीपर्यंत रस्तोरस्तीं भटकत राहिला. शेवटीं त्याला एके ठिकाणीं निर्जन रस्ता आढळला. तिथेच रस्त्यावर तो झोपी गेला. पण तो निराश झाला नाहीं. नांवारूपाला येणारी माणसे धैर्यवान असतात. आणि लहान बुकर मोठेपणीं थोर विभूति झाला.

शेवटीं तो इच्छित शाळेत पोहचला. शाळेंची इमारत पाहताच त्याला खूप आनंद झाला. बुकरचा पहिला धडा होता शाळेची एक खोली झाडून काढणे, आणि हा धडा त्यानें चांगला गिरवला. एकदां झाडून तो समाधान पावत नसे. तीनदां खोली झाडायचा आणि चारदां तिच्यांतल्या सामानावरची धूळ झटकायचा. खोली कशी लख्ख व्हायची.

आपला अभ्यासही त्याने असाच मन लावून आणि काळजीपूर्वक केला. प्रत्येक गोष्ट काळजीपूर्वक करण्याच्या त्याच्या स्वभावामुळेंच त्याने नांव कमविलें.

मोठा झाल्यावर त्याने तुस्केगी अल्बामा शहरांत एक शाळा काढली सुरूवातीला त्याची शाळा एका जुन्या स्वयंपाकघरांत आणि कोंबडयांच्या खुराडयांत भरत असे. पण तरीहि तो निराश झाला नाहीं. तो म्हणायचा "कधीं काळीं माझी शाळा अशी नांवाजेल की ती पाहण्यासाठीं अमेरिकेचे अध्यक्षही आनंदाने येतील," आणि त्याचे स्वप्न साकार झाले.

बुकर टी. वॉशिंग्टन् प्रमाणें आपल्यालाही महात्म्य मिळविता येईल, जर आपण त्याच्याप्रमाणे आपली नित्यांची कामें, ती क्षुल्लक कां असेना, चोख करण्यास शिकूं.

# मुंगी आणि नाकतोडा

एक ख्यालीखुशालींत रमणारा रंगेल नाकतोडा होता. कधीं पुढचा विचार करायचा नाहीं ! " आज सुख मिळते आहे ना ? मग उद्याचीं काळजी कां करा ?" अशी त्याची वृत्ति असे. वसंत ऋतु आला. रंगेल नाकतोडा खेळला, बागडला, नाच-नाच नाचला. परंतु लवकरच वसंत ऋतु जाऊन हेमंत ऋतु येणार आणि वेळींच अन्न साठविलें नाहीं तर आपल्यावर उपासमारीची पाळी येणार याची त्याला फिकिरच नव्हती. पण काळ थांबतो आहे कां कुणासाठीं ? झालें—उन्हाळा गेला नि हिंवाळा आला. झाडांची पानें झडलीं. फुले अदृश्य झाली. भूमि बर्फमय झाली. आता नाकतोडा काय करणार ? खायला कांहीं मिळेना. भुकेने जीव कासावीस होऊं लागला. शेवटी स्वाभिमान गुंडाळून ठेवून गेला भीक मागत क्षुद्र मुंगीकडे,

"मुंगीताई, मुंगीताई,  
पोटाला अन्न दे ।  
निवाऱ्याला जागा दे ।  
उसने दे आज मला ।  
फेड करतो उद्या तुला ।। "

मुंगीने त्या अवाढव्य नाकतोड्याकडे पाहिलें.

"तूं माझ्यापेक्षां इतका सबळ,  
कां असावी तुजला नड ?  
होतास करीत काय उन्हाळाभर ?"

तिने सरळ सवाल केला.

"काय सांगू, भगिनीं, तुला ।  
होतो नाचत बागडत मी ।  
नव्हती अक्कल तुजइतकी मजला ।  
म्हणूनच मरतो नाहक मी ।।"

मुंगीने क्षणभर विचार केला. मग ती म्हणाली, "गड्या, अजून तरी अक्कल कुठें आहे तुला? तूं म्हणतोस कीं 'मी नाहक मरतो.' तुझ्याच करणीमुळें तूं मरत नाहीस.काय? आपण उपाशी मरतो म्हणून तूं पस्तावला आहेस परंतु तुझ्या चुकीचे, तुझ्या मूर्खपणाचे तुला कांहींच वाटत नाहीं. हे दिवस गेले कीं तूं पुन्हां तीच चूक करणार हे ठरलेलेंच. तें कांहीं नाहीं. चुकीबद्दल पश्चात्ताप झालेला मनुष्यच सुधारतो. चुकीमुळें ओढवणाऱ्या आपत्तीला भिऊन तात्पुरतें दु:ख व्यक्त करणारे, आपत्ति दूर झाल्यावर पुन्हां तीच चूक परत करण्यास कचरत नाहींत. त्यांतलाच तूं आहेस. तेव्हां श्रमाने मिळविलेले माझे अन्न मी तुझ्यासारख्याला देणार नाहीं."

आणि मुंगीने आपले दार लावून घेतलें. तुम्हांला काय वाटते– तिने योग्य तेंच केले किंवा नाहीं ?



परतु माझ्यासवें विश्वांत ।
नसेल भाग्यवंत दुजा ।।

# देव तारी त्याला कोण मारी?

तिच्या जन्माच्यावेळीं तिच्या आईने तिचे नांव फ्रान्सेस जेन असे ठेवलें होते. पण तिला सारे लाडाने फॅनी म्हणत. तिचे डोळे फारच मोहक होते. सर्वजण त्या गोड डोळ्यांची प्रशंसा करीत.

एके दिवशी बाळाचें, फॅनीचे,डोळे लाल आणि थिजलेले दिसूं लागले. आईने धावरून डॉक्टरांना बोलाविले. डॉक्टरांनी औषधें लिहून दिली. परंतु डोळे बरे होण्याऐवजी हळूंहळूं अधिक बिघडत गेले. शेवटी बिचाऱ्या बाळाला कांहींही दिसेनासें झालें.

विचारी आंधळी फॅनी! आणि तिची आई! ती तरी काय करणार? कधीं-तरी त्या लहानग्या डोळ्यांना परत दृष्टि येईल हीच आशा मनीं बाळगून ती दिवस कंठूं लागली. पण दुर्दैवाने तसें कधींच झालें नाहीं. फॅनी पांच वर्षांची असतांना न्यूयॉर्क या राजधानीच्या शहरांतल्या सर्वात कुशल डॉक्टरांना पाचारण करण्यांत आले. पण तेसुद्धां फॅनीसाठीं कांहीं करूं शकलें नाहीं. त्यांनी मात्र आगींत तेल ओतल्याप्रमाणें सांगितले की पुन्हां फॅनीच्या डोळ्यांना हें जग दिसण्याची मुळींच शक्यता नाहीं.

तुम्हांला काय वाटते? फॅनी जसजशीं मोठीं होऊ लागलीं तसतशी ती गंभीर आणि दु:खी होत गेली असेल म्हणून ? छे, आपल्या अंधाऱ्या जगांत तिने आनंद निर्माण केला. तिच्या आईने तिला अनेक सुंदर कविता शिकविल्या होत्या. फॅनीला गायनाची फार आवड होती. ती स्वत: कविता व गाणी लिहिण्याचा प्रयत्न करूं लागली. आठ वर्षांची असतांना तिने खालील ओळी लिहिल्या —

"अमाप सुखें असती जगांत ।  
जरी दृष्टी नसे मला ।  
परंतु माझ्यासवे विश्वांत ।  
नसेल भाग्यवंत दुजा ।।"

फॅनीची आई फार समंजस आणि प्रेमळ होती. ती नेमाने बायबलमधील देवाची वचनें फॅनीला समजावून सांगत असे. तिचा अनुभव होता की बायबलमधील ईश्वरप्रेरित संदेश नैराश्यपूर्ण जीवनांत आशा आणि आनंद निर्माण करतो. तिच्या लहानग्या फॅनीला बाह्य सूर्यप्रकाश जरी दिसत नसला तरी शास्त्रवचनांमुळें तिच्या अंधारमय जीवनांत धार्मिकतेचा सूर्य प्रकाशून तिच्या आयुष्याचे सार्थक झाल्याशिवाय रहावयाचे नाहीं. फॅनी शास्त्रवचनें मुखपाठसुद्धां करीत असे. असे सांगतात की ती केवळ दहा वर्षांची असताना बायबलमधील चार मोठमोठे विभाग एकही चूक न करता तोंडपाठ म्हणून दाखवीत असे.

आपल्या आत्मचरित्रांत फॅनी म्हणते, "माझी आवडती करमणूक म्हणजे निसर्गाचे अनेक आवाज ऐकत बसणें. वाऱ्याचे हसणें खिदळणें, वादळाचे हुंदके, पाण्याची खळखळ, पावसाचे छतावरचे नृत्य, विजेचा गडगडाट मला फार फार आवडतो. त्यांच्यामुळे मी स्वप्नसृष्टींत वावरलें आहे — कधी खलाशी बनले आणि वादळांत नाव हाकारली, तर कधी सेनापति बनून मोठ्या सैन्याचे नेतृत्व केले; कधीं वक्ता बनून जनसमुदायापुढे भाषण केले, तर कधीं भव्य मंदिरात देवाची भजनें म्हटली. जगात कांहींतरी महान कार्य करावें असे मला नेहमीं वाटत असे. पण कोणाते नि कर्मे करावें हीच गभीर समस्या होती.

" एक गरीब अंधळी मुलगी कुणाच्या मदतीविना हवेंत मनोरे बांधण्यापलिकडे काय करूं शकणार ? कोण तिच्या आकांक्षा पुऱ्या करणार ? 'तूं आंधळी आहेस, जगाने तुच्छ लेखलेली. तुझ्यामध्यें कोणतेही गुण असले तरी त्यांचा काय उपयोग ? डोळ्यांवाचून कां तुझे मनोरथ साकार होतील ? कशाला व्यर्थ आशा मनीं बाळगाव्या ? त्यामुळें जगाला कांहीच वाटणार नाहीं, तूं मात्र तुझी मन:शांति घालवून बसशील.' असल्या विचारांनी मी स्वत:चे सांत्वन करण्याचा प्रयत्न करीत असे. परंतु म्हणून कां मनाची व्यथा दूर होणार ? उलट दु:ख उचंबळून येई आणि मी कळवळून ईश्वराला म्हणे, ' माझ्या देवा, मी अंधळी असले तरी तुझीच कन्या नाहीं कां ? मग तुझ्या मोठ्या जगांत मला कार्यक्षम होण्यास मनाई कां ?'

ईश्वराचे मला उत्तर येई त्याच्या वचनांतून, बायबलमधून:" मुली, मी माझा प्राण क्रूर क्रूसावर तुझ्यासाठी दिला तो तुझ्यावर अत्यंत प्रेम आहे म्हणूनच ना ? पापामुळे जगांत संकटे आली, रोग आले, मृत्यु आला. स्वत:च्या किंवा इतरांच्या पापांचा परिणाम प्रत्येकाला जगांत असेपर्यंत भोगावा लागतो. त्याप्रमाणे तुलाही अंधत्व सहन करावे लागत आहे. परंतु म्हणून तूं खचून जायचे कारण नाही. मी तुझ्यावरोवर आहे ना ? तूं माझा मार्ग धरून रहा आणि मी तुला गौरवीन, तुला शांति लाभेल."

"ईश्वराच्या वचनामुळें मला धैर्य आले. माझ्यांत असलेल्या उणीवेचे, अंधत्वाचे, कांही वाटेनासें झाले. मी नेमानें मंदिरांत परमेश्वराच्या आराधनेस जात असे. तिथे गायल्या जाणाऱ्या भक्तिगीतांचे मला विलक्षण आकर्षण वाटू लागले. आपणही अशी भक्तिगीते रचावी, अशी प्रेरणा होऊ लागली."

पंधरा वर्षांची असतांना फॅनी न्यूयॉर्क शहरांतील अंधांच्या शाळेंत दाखल झाली. तिथें तिनें नऊ वर्षे आनंदात घालविली आणि पदवी संपादन केली. त्यानतर ती त्याच शाळेत शिक्षिका झाली. अकरा वर्षे तिने त्या शाळेंत शिकविले. संकटे आपल्याला देवाजवळ खेचतात. आपत्ति कोसळल्यावर आपण अधिक मनोभावे देवाचा धावा करतो. मग आपल्याला तो अविस्मरणीय अनुभव येतो कीं देव सर्वदा, सुखांत आणि दु:खांत, समृद्धीत आणि विपत्तीत, आपल्या भक्तांजवळ असतो. आपल्या भक्तांना नैराश्यमय सागरांत पूर्णपणे बुडवून टाकणारे प्रसंग तो त्यांच्यावर येऊंच देत नाहीं, परंतु सतत तो त्यांना आशेचा किरण दाखवीत असतो. फॅनीलाही अंधत्व आल्यामुळें देवाच्या दयेची जाणीव विशेष रूपाने झाली आणि परमेश्वराच्या सान्निध्यांत आपले दिवस घालविण्याचा प्रयत्न ती करूं लागली.

ती म्हणते, " माझी पूर्ण खात्री आहे की अंधत्वाच्या विपत्तीमुळेच मी नम्र झाले आणि प्रभूच्या अगाध प्रेमाची मल. प्रचीति आली. त्यामुळेच आता माझी भक्तिगीतें मी भावनावश होऊन लिहू शकते आणि इतरांनाही त्यांच्याद्वारे स्फूर्ति मिळते."

फॅनीची आई फार समंजस आणि प्रेमळ होती. ती नेमाने बायबलमधील देवाची वचनें फॅनीला समजावून सांगत असे. तिचा अनुभव होता की बायबलमधील ईश्वरप्रेरित संदेश नैराश्यपूर्ण जीवनांत आशा आणि आनंद निर्माण करतो. तिच्या लहानग्या फॅनीला बाह्य सूर्यप्रकाश जरी दिसत नसला तरी शास्त्रवचनां-मुळें तिच्या अंधारमय जीवनांत धार्मिकतेचा सूर्य प्रकाशून तिच्या आयुष्याचे सार्थक झाल्याशिवाय रहावयाचे नाहीं. फॅनी शास्त्रवचनें मुखपाठसुद्धां करीत असे. असे सांगतात की ती केवळ दहा वर्षांची असताना बायबलमधील चार मोठमोठे विभाग एकही चूक न करता तोंडपाठ म्हणून दाखवीत असे.

आपल्या आत्मचरित्रांत फॅनी म्हणते, "माझी आवडती करमणूक म्हणजे निसर्गाचे अनेक आवाज ऐकत वसणें. वाऱ्याचे हसणें खिदळणें, वादळाचे हुंदके, पाण्याची खळखळ, पावसाचे छतावरचे नृत्य, विजेचा गडगडाट मला फार फार आवडतो. त्यांच्यामुळे मी स्वप्नसृष्टींत वावरलें आहे – कधी खलाशी बनले आणि वादळांत नाव हाकारली, तर कधी सेनापति बनून मोठ्या सैन्याचे नेतृत्व केले; कधीं वक्ता बनून जनसमुदायापुढे भाषण केले,तर कधीं भव्य मंदिरात देवाची भजने म्हटली. जगात कांहींतरी महान कार्य करावें असे मला नेहमीं वाटत असे. पण कोणते नि कसें करावें हीच गंभीर समस्या होती.

"एक गरीब अंधळी मुलगी कुणाच्या मदतीविना हवेंत मनोरे बांधण्या-पलिकडे काय करू शकणार ? कोण तिच्या आकांक्षा पुऱ्या करणार ? 'तूं आंधळी आहेस, जगाने तुच्छ लेखलेली. तुझ्यामध्यें कोणतेही गुण असले तरी त्यांचा काय उपयोग ? डोळ्यांवाचून कां तुझे मनोरथ साकार होतील ? कशाला व्यर्थ आशा मनीं बाळगाव्या ? त्यामुळें जगाला कांहींच वाटणार नाहीं, तूं मात्र तुझी मन:शांति घालवून बसशील.' असल्या विचारांनी मी स्वत:चे सांत्वन करण्याचा प्रयत्न करीत असे. परंतु म्हणून कां मनाची व्यथा दूर होणार ? उलट दु:ख उचंबळून येई आणि मी कळवळून ईश्वराला म्हणे, 'माझ्या देवा, मी अंधळी असले तरी तुझीच कन्या नाहीं कां ? मग तुझ्या मोठ्या जगांत मला कार्यक्षम होण्यास मनाई कां ?'

ईश्वराचे मला उत्तर येई त्याच्या वचनांतून, बायबलमधून:" मुली, मी माझा प्राण क्रूर क्रूसावर तुझ्यासाठी दिला तो तुझ्यावर अत्यंत प्रेम आहे म्हणूनच ना ? पापामुळे जगांत संकटे आली, रोग आले, मृत्यु आला. स्वत:च्या किंवा इतरांच्या पापांचा परिणाम प्रत्येकाला जगांत असेपर्यंत भोगावा लागतो. त्याप्रमाणे तुलाही अंधत्व सहन करावे लागत आहे. परंतु म्हणून तूं खचून जायचे कारण नाही. मी तुझ्यावरोबर आहे ना ? तूं माझा मार्ग धरून रहा आणि मी तुला गौरवीन, तुला शांति लाभेल."

"ईश्वराच्या वचनामुळें मला धैर्य आले. माझ्यांत असलेल्या उणीवेचे, अंधत्वाचे, कांही वाटेनासें झाले. मी नेमाने मंदिरांत परमेश्वराच्या आराधनेस जात असे. तिथे गायल्या जाणाऱ्या भक्तिगीतांचे मला विलक्षण आकर्षण वाटू लागले. आपणही अशी भक्तिगीते रचावी, अशी प्रेरणा होऊ लागली."

पंधरा वर्षांची असतांना फॅनी न्यूयॉर्क शहरांतील अंधांच्या शाळेंत दाखल झाली. तिथें तिनें नऊ वर्षे आनंदात घालविली आणि पदवी संपादन केली. त्यानंतर ती त्याच शाळेत शिक्षिका झाली. अकरा वर्षे तिने त्या शाळेंत शिकविले. संकटे आपल्याला देवाजवळ खेचतात. आपत्ति कोसळल्यावर आपण अधिक मनोभावे देवाचा धावा करतो. मग आपल्याला तो अविस्मरणीय अनुभव येतो कीं देव सर्वदा, सुखांत आणि दु:खांत, समृद्धीत आणि विपत्तीत, आपल्या भक्तांजवळ असतो. आपल्या भक्तांना नैराश्यमय सागरांत पूर्णपणे बुडवून टाकणारे प्रसंग तो त्याच्यावर येऊंच देत नाहीं, परंतु सतत तो त्यांना आशेचा किरण दाखवीत असतो. फॅनीलाही अंधत्व आल्यामुळें देवाच्या दयेची जाणीव विशेष रूपाने झाली आणि परमेश्वराच्या सान्निध्यांत आपले दिवस घालविण्याचा प्रयत्न ती करूं लागली.

ती म्हणते, ' माझी पूर्ण खात्री आहे की अंधत्वाच्या विपत्तीमुळेच मी नम्र झालें आणि प्रभूच्या अगाध प्रेमाची मला प्रचीति आली. त्यामुळेच आता माझी भक्तिगीतें मी भावनावश होऊन लिहू शकते आणि इतरांनाही त्यांच्याद्वारे स्फूर्ति मिळते."




"प्रिय प्रभूच्या हातीं सुरक्षितसा मी ॥"

फॅनी क्रॉस्बीने भक्तिगीतें रचावी ही देवाचीच इच्छा होती. खिरस्ती समाजाला तिने पांच हजारांहून अधिक स्वरचित भक्तिगीतें दिली. त्यांतील कांहींना बक्षिसेंहि मिळाली आहेत.

लहान लहान मुलांनासुद्धां तिची भक्तिगीतें फार आवडतात, एके दिवशीं दोन लहान मुली घरांत एका कोपऱ्यांत खेळत होत्या, आणि खेळता खेळता गात होत्या, फॅनीने रचलेले एक गीत.

प्रिय प्रभूच्या हातीं ।
सुरक्षितसा मी ।
माझ्या जीवा विश्रांती ।
होईल नेहमीं ।।

"ताई, तुला काय माहीत कीं तूं सुरक्षित आहेस म्हणून?" लहानग्या विमलने विचारलें.

"कारण मी आपल्या दोन्ही हातांनी प्रभू येशूला घट्ट धरून ठेवले आहे!" ताईने उत्तर दिलें.

"पण तें कांहीं सुरक्षित नाही!" विमल म्हणाली, "समजा सैतान आला आणि त्यानें तुझे दोन्ही हात कापून काढले तर ?"

ताई विचारांत पडली, मग उसळून म्हणाली, "अरे, मी विसरलेंच होते. प्रभू येशूने मला दोन्ही हातांनीं घट्ट धरून ठेवलें आहे आणि त्याचे हात सैतान कापून टाकूं शकत नाहीं म्हणून मी सुरक्षित आहे."

फॅनीने एका आंधळ्या गृहस्थांबरोबर लग्न केले. पण तिने आपली सर्व गीतें आपल्या लग्नापूर्वीच्या नांवानेंच प्रसिद्ध केली. ती १९१५ सालीं वयाच्या ९५ व्या वर्षी मरण पावली.

जेव्हां तिच्या प्रदीर्घ झोपेंतून प्रभू येशू तिला जागें करील तेव्हां ती अंध नसणार. तिच्या आकर्षक डोळ्यांस जगांतल्या नश्वर वस्तू दिसणार नाहींत तर स्वर्गमय पृथ्वीचे अतुलनीय सौंदर्य तिच्या दृष्टीस पडेल.



# सुरवंटाचे फुलपाखरूं

उन्हाळयांत एके दिवशीं नरेंद्र आणि मालती मखमलीप्रमाणें मऊ असलेला एक किडा हातांत घेऊन पळतच घरांत घुसली.

"आई, हा किडा बघ तर! किती सुंदर आहे? याला काय म्हणतात ग?" त्यांनी विचारलें.

आईने तो हिरवट पिवळा सुरवंट पाहताच त्याला ओळखलें की तो सुरवंट आहे. ती म्हणाली, "कुठे सापडला तुम्हांला तो?"

"इथेच . . .तें झाड आहे ना त्यावर!" त्यांनी उत्तर दिलें.

"समजा आपण त्याचा सांभाळ केला, तर आपणाला त्याच्याबद्दल बरेच शिकता येईल, नाहीं कां?" आईने सुचविलें, "त्या झाडाची एक लहानशी फांदी आणा आणि ती पेलाभर पाण्यांत बुडवून ठेवा. म्हणजे ती ताजी राहील. आणि मग तिच्यावर सुरवंटाला ठेवा म्हणजे त्याला अगदी घरच्यासारखे वाटेल. त्याला खिडकींत ठेवले तर त्याला हवी ती उष्णताहि मिळेल."

मुलांनी लगेच झाडाची एक फांदी तोडून आणली, आणि सुरवंटाला त्यावर ठेवले. तो पूर्ण समाधानी दिसत होता. लगेच त्याने पाने खायला सुरुवात केली सुद्धां! आणि त्याने कितीं खावें? दररोज मुलें नव्या नव्या फांद्या आणून पेल्यांत ठेवायची आणि सुरवंट मात्र खा खा पानें खायचा !

"त्याच्या अंगावरचे पट्टे मला वाघासारखें दिसतात. मी त्याला टॅग म्हणणार!" नरेंद्र म्हणाला आणि त्या दिवसापासून त्याला सर्वजण टॅगच म्हणूं लागले.

काही दिवसांनी टॅगने खाणें सोडून दिलें. तो शांतपणे पानावर बसून राही. मुलें काळजींत पडली. ते त्याच्याकडे पाहून तो आजारी तर पडला नसावा ना, असा विचार करूं लागली. खरं म्हणजे आजारी पडावे इतके त्याने खाल्ले होते नक्कीच. पण लवकरच त्यांना काय दिसलें ठाऊक आहे? त्याची कातडी जागोजागीं फाटली. पण या जुन्या कपड्यांची त्याला काळजी नव्हती, कारण त्याखाली नवे करकरीत कपडे होते. त्यांतून बाहेर येताच तो पूर्वीपेक्षा मोठा झाल्याचे त्यांना दिसले. अन तो मग पुन्हां खायला बसला !

"छान, टँग, हे बाकी छानचं हं!" नरेंद्र म्हणाला, "कातडी फाटेपर्यंत खावें आणि ती नवी आली की पुन्हां खाणें सुरूच!"

"तो आपले जुने शरीर टाकतो," आईने समजावून सांगितले. "अशा-रीतिनेच तो वाढत असतो. मला वाटते आतापर्यंत त्याने तिनदां असे शरीर टाकले असावे. तो आता इतका मोठा झाला आहे की मला वाटते ही त्याची शेवटची वेळ असावी. नरेंद्र त्याची लांबी किती आहे बघ पाहूं!"

नरेंद्रने लगेच पट्टी आणली. आणि त्याने सुरवंटाची लांबी मोजली. टँग जवळजवळ दोन इंच लांब होता.

त्यानंतर आणखी आठवडाभर तो खातच होता. मग एके दिवशीं तो तिथून दिसेनासा झाला. मुलांनी वरखालीं त्याचा खूप शोध केला. पण त्यांना त्याचा पत्ता लागला नाहीं. त्यांना काळजी वाटू लागली.

"आपण त्याच्यावर मच्छरदाणीचे कापड घालायला हवें होते," आई म्हणाली. "पण मला वाटते, त्याचे अन्न इथें असल्यामुळे तो जवळपासच कुठें तरी असणार. तो झोपण्यासाठी शांत जागा शोधत असणार एवढेंच. आता मात्र त्याचे खाणे संपले हें नक्की !"

दुसऱ्या दिवशी तो पुन्हां मुलांच्या नजरेस पडला. तो डोकें खाली करून खिडकीच्या पडद्याला लटकला होता. त्याने रेशमाची एक गुंडी विणून ती पडद्याच्या एका टोकाला चिकटविली होती, आणि तो स्वतः माश्याच्या गळा-सारखा वर्तुळाकार झाला होता.

"आज तुम्ही त्याला जरा बारकाईने पहा हं!" आईने सांगितले. "तो आता अधिक आश्चर्यकारक असें कांहींतरी करील असे दिसते !"

मुलें त्याच्याकडे पाहात होती. तो शांतपणे लटकलेला दिसत होता. दिवसभर मुले मधून मधून डोकावत होती. मग त्यांच्या लक्षांत आलें कीं हळूहळू एक पातळ थर त्याच्या सबंध शरीरावर चढत आहे.

"त्याने आतापर्यंत इतके खाल्ले आहे की तो आता झोपेशिवाय राहूंच शकत नाही. म्हणून तो स्वतःसाठी पाळणा बांधत आहे!" आई म्हणाली.

दुपारी चार वाजता त्याने काय केले असावे असे तुम्हांला वाटते? त्याने आपली त्वचा आपल्या पाठीवर उघडली!

नंतर त्याने हळूंहळूं ती वर सरकावयाला सुरुवात केली. पण टॅगसाठी वर म्हणजे त्याच्या पायाकडे ! कारण तो डोकें खाली करून लटकलेला होता.

त्याचे ते कपडे पूर्णपणे बाहेर येताच त्याने तें तिथेच राहूं दिले. त्याच वेळी त्याने आपला नवा पाळणाहि त्या रेशमी गुंडीलाच बांधून टाकला आणि त्यांत तो जाऊन बसला. पण तरीहि मुले बाहेरून पाहूं शकत होती. तो आळोखे-पिळोखे देऊन झोपण्यासाठी योग्य स्थिती शोधत होता. आणि मग थोड्याच वेळांत सारे शांत झाले. तो लठ्ठ सुरवंट शरीराचे वेटोळे करून शांतपणे झोपीं गेला.

त्याचा पाळणा म्हणजे एक कौशल्यपूर्ण वस्तू होती. कुणीतरी त्याला 'सोन्याच्या खिळयांनी बनविलेला कांचेचा महाल" म्हटलें तें खरेच होते. त्याचा रंग फिक्कट हिरवा होता. आणि टोकाजवळचा भाग सोनेरी ठिपक्यांनी चमकत होता. कुठल्याहि राजाला इतका नाजूक आणि सुंदर पाळणा कधीं मिळाला नसावा. तसे पाहता हा पाळणा फारतर एखादा इंचच लांब होता.

"आता तो उठणार आहे," एके दिवशीं आई म्हणाली. "आता त्याचे नवे कपडे आपण अधिक काळजीपूर्वक पाहिले पाहिजे. इतके दिवस तो तेच बनवीत होता. तो घालतो कसे तेहि बघायला हवे !"

"मला तर त्याचा झगा आताच दिसूं लागलाय," मालती म्हणाली. "तो करडया रंगाचा असून, त्यावर पांढरे आणि काळे ठिपके दिसताहेत !"

तोच टॅगने आपला पाळणा उघडला, आणि त्याच वेळी आपण खाली पडूं नये म्हणून आपल्या पायांनी चटकन त्याचा काठ पकडला. सुरवंटाचे फुल-पाखरूं झाले होते. मग तो आपल्या चार लहान लहान पंखांसह तिथेंच लटकून राहिला. त्याचे शरीर मात्र फारच मोठे दिसत होते.

"तो कधींच उडू शकणार नाहीं," नरेंद्र म्हणाला. त्याच्या आवाजांत निराशा होती. "तें इवलालें पंख एवढे मोठे शरीर कधींच उचलूं शकणार नाहींत!"

"जरा थांबशील की नाहीं?" आईने बजावलें.

तोच त्यांनी टॅंगला कसला तरी द्रव पदार्थ आपल्या पंखांत भरतांना पाहिलें. त्याचे पंख मोठे मोठे होतांना दिसत होते. जसजसा तो द्रव पदार्थ आंत जाऊं लागला तसतसे त्याचे पंख प्रसरण पावू लागले.

"आपल्या टॅंगचे खरे नांव महाराजा आहे," आई म्हणाली. "तो खरा महाराज फुलपाखरुं आहे. आपण राजाला त्याच्या शरीराने, त्याच्या मोठ्या झग्याने ओळखतो, नाहीं कां ?"

"त्याचे नांव त्याला शोभते खरें ! तो खरेंच राजा आहे. राजशाही पाळण्यांत जन्मलेला !" नरेंद्र म्हणाला.

"सुरवंटाचे फुलपाखरुं होण्यासारखे नवल जीवसृष्टीत दुसरे कोणतेहि नाहीं," आई म्हणाली. "सुरुवातीला एक साधा अळीसारखा कीटक, जमिनीवरून सरपटणारा, परंतु शेवटी आपल्या राजशाही पंखांनी निसर्गांत भराऱ्या मारणारा. मला यावरून बायबलमध्यें लिहिलेल्या गोष्टीची आठवण झाली. बायबल म्हणते, हें (शरीर) जे विनाशी त्याने अविनाशीपण परिधान करावें आणि हें जें मर्त्य त्याने अमरत्व परिधान करावे हें आवश्यक आहे.

सुरवंटाचे फुलपाखरुं बनणे हे देवाचे एक अचाट कृत्य आहे. यात देवाचे कौशल्य दिसते. परंतु पापी मनुष्याचे पाप हरण करून त्याला निष्पाप बनविणें आणि अमरत्व देणे हे देवाचे याहीपेक्षां महान कृत्य आहे. पण हे वरदान आपणास मिळण्यास प्रथम आपली तयारी असली पाहिजे. आपण स्वतःला परमेश्वराला सर्वस्वी सोंपले पाहिजे. आपल्या अंतःकरणात येशूला स्थान दिलें पाहिजे. मग तो आपल्याला स्वर्गाच्या लायकीचे बनवितो. मग आपल्याला स्वर्गांत स्थान मिळेल, आपण अमर होऊं यांत शंकाच नाहीं."

# स्तुतीस निमंत्रण

परमेशाला स्तवा । सदोदित । परमेशाला स्तवा ।।धृ।।

प्राणीमात्रहो, त्रिभुवनवासी । त्रिभुवननाथा स्तवा ।।
स्वर्लोकांनो, देवदूतांनो । परात्पराला स्तवा ।।

चंद्र, सूर्य, नक्षत्र, ग्रहांनो । विश्वव्यापका स्तवा ।।
मेघ, मरुत, पर्जन्य, हिमांनो । विश्वव्यापका स्तवा ।।

ग्रीष्म, शरद, हेमंत ऋतुंनो । विश्वनियंत्या स्तवा ।।
प्रभात, संध्या, प्रकाश, तम हो । जगत्प्रकाशा स्तवा ।।

गिरी दरींनो, जलाशयांनो । जगन्नायका स्तवा ।।
पशुपक्षांनो, जीवजंतुंनो । जगज्जीवना स्तवा ।।

वृक्षलतांनो, पुष्पफलांनो । विश्वपतीला स्तवा ।।
जलचर, भूचर, सर्व चराचर । जगच्चालका स्तवा ।।

सानथोर हो, मानव सारे । जगदुद्धारा स्तवा ।।
प्रभु रायाचे याजक, सेवक, । साधुसंत, त्या स्तवा ।।

धन्यवाद गा सदा तयाचा । महिमा त्याचा स्तवा ।।
परमपवित्रा, प्रेमळ त्रितया । युगानुयुग हो स्तवा ।।

— स. आ. पाठक.



"शून्य कुठें आहे ?" त्यांनी विचारलें.